# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२१

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**तुळेगांव-दाभाडे (जि.पुणे) येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन या वास्तुची झालेली दुरवस्था**

**(१) १७०० (०३-०४-२०२०). श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी), श्री.संदिप क्षिरसागर (बीड), श्री.यशवंत माने (मोहोळ), ॲड.माणिकराव कोकाटे (सिन्नर), श्री.अतुल बेनके (जुन्नर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या निधीतून तत्कालीन कामगार नेते जॉर्ज फर्नांडीस यांचे नेतृत्वाखालील म्युनिसिपल मजदूर युनियनतर्फे सन १९९५ मध्ये तळेगांव-दाभाडे येथील डॉ.राम मनोहर लोहिया समाजवादी विद्यापीठाच्या शेजारील जागेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन या नावाने बंगला खरेदी करण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डॉ.राम मनोहर लोहिया विद्यापीठाच्या नुतनीकरणाच्या नावाखाली विद्यापीठ प्रशासनाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन हा बंगला उध्वस्त केल्याचे दिनांक १६ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक १८ डिसेंबर, २०१९ रोजी महानगरपालिका कर्मचाऱ्यांनी चलो डिलाईल रोड (मुंबई) असा मोर्चा काढून शासनाचे या वास्तूकडे लक्ष वेधले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-१२-२०२१) :** (१) तळेगांव-दाभाडे नगरपरिषद कर विभागाची असेसमेंट रजिस्टरची पाहणी केली असता, कडोलकर कॉलनी, प्लॉट क्र. १६३, १७४, १७५ हे राम मनोहर लोहिया विद्यापीठातर्फे शरद जगनाथ राव, सेक्रेटरी ट्रस्टी व श्री. महाबळ शेट्टी मॅनेजिंग ट्रस्टी यांची नावे नोंद असल्याचे जिल्हाधिकारी, पुणे यांनी कळविले आहे.

(२) सन २००६-०७ कर आकारणीनुसार सदर ठिकाणी तळमजला येथे आरसीसी किचन व स्टोअर तसेच शेजारी पत्र्याचे छप्पर असलेले खुले भोजन कक्ष असून, प्रथम मजल्यावर तीन खोल्या (कामगार निवास) पुढे बंदिस्त मोकळी जागा असल्याचे आढळून येते. सदरची नोंद सन २०१८-१९ च्या असेसमेंटमध्ये देखील तशीच आढळून येते असे जिल्हाधिकारी, पुणे यांनी कळविले आहे.

(३) हे खरे नाही असे गृह विभागाने कळविले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शासनाने स्थगिती देऊनही आरे (मुंबई) येथील कामे सुरु असल्याबाबत**

**(२) १९१३ (०३-०४-२०२०). डॉ.तानाजी सावंत (परांडा) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेट्रो-३ च्या कारशेडसाठी झाडांची कत्तल आणि त्या अनुषंगीक कोणतीही कामे करु नये म्हणून शासनाने दिलेली स्थगिती व आरे ऐवजी दुसरा पर्याय शोधण्यासाठी नेमण्यात आलेल्या समिती अस्तित्वात असूनही आरेतील कामे सुरु असल्याची बाब दिनांक १५ जानेवारी, २०२० रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरे संबंधित पर्यावरण प्रेमी आणि आदिवासी पाड्यातील रहिवाशी यांनी वेळोवेळी संबंधित अनधिकृत कामासंबंधी सनदशिर मार्गाने आक्षेप घेतलेला असूनही याबाबत कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले व तद्नुसार शासनाकडून संबंधीत दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) शासनाच्या आदेशाप्रमाणे मेट्रो कारशेड, आरे कॉलनी येथील कामे दिनांक २९ नोव्हेंबर, २०१९ पासून पुढील आदेश होईपर्यंत बंद करण्यात आलेली आहेत. सद्य:स्थितीत स्थगिती असलेल्या मेट्रो कारशेडच्या जागेवर कुठल्याही प्रकारची कामे चालू नाहीत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील वडाळा येथील जीएसटी मुख्यालय इमारत आणि वडाळा मेट्रो स्थानकाच्या जमीनीसंदर्भातील अडथळे दूर करण्याबाबत**

**(३) २४५३ (२१-०३-२०२०). श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वडाळा येथील जीएसटी मुख्यालय इमारत आणि वडाळा मेट्रो स्थानकाच्या जमीनी संदर्भात अडथळे निर्माण झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी मा.उपमुख्यमंत्री यांनी दिनांक १४ जानेवारी, २०२० रोजी वा त्या सुमारास अडथळे दूर करण्याच्या अनुषंगाने मेट्रोसह मुंबई शहरातील विकास प्रकल्पांच्या कामात खंड पडू नये व प्रकल्प पर्यावरण पुरक व्हावेत तसेच प्रकल्पाच्या परिसरात मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करण्यात यावेत यासाठी मंत्रालयात आयुक्त व अतिरिक्त आयुक्त, एमएमआरडीए, अतिरिक्त मुख्य सचिव, वित्त विभाग यांची बैठक बोलावण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या बैठकीत कोणते निर्णय घेण्यात आले आहेत व त्यानुषंगाने केलेली कार्यवाही व अंमलबजावणीची सद्यःस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०१-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) एमएमआरडीएला तात्पुरत्या स्वरुपात दिलेली जागा वस्तू व सेवा कर विभागाला परत करुन, वस्तू व सेवा कर भवन व मेट्रो-४ रेल्वे स्थानक इमारतींच्या एकत्रिकरणाची शक्यता तपासावी. त्याचबरोबर मेट्रो-४ वडाळा टीटी रेल्वे स्थानकाचे व रेल्वे मार्गिकेचे काम तात्काळ सुरु करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच मेट्रो -४ वडाळा टीटी रेल्वे स्थानकावर छत करून त्यावर हरित क्षेत्र(प्लाझा) करण्यास मान्यता देण्यात आली.

त्यानुषंगाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) यांना मेट्रो-४ च्या कास्टिंग यार्डसाठी तात्पुरत्या स्वरुपात दिलेल्या १३,००० चौ.मी. जागेचा ताबा त्यांच्याकडून घेऊन एमएसआरडीसी यांना बांधकामाकरीता देण्यात आला आहे, तसेच मेट्रो-४ च्या वडाळा रेल्वे स्थानकाच्या बांधकामासाठी एमएमआरडीएने मागणी केल्यानुसार वस्तू व सेवा कर विभागाच्या भूखंडामधील ४१०६.२६ चौ.मी. जागेचा ताबा देण्यास मा.मुख्यसचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीने मान्यता दिली. तसेच वित्त विभागामार्फत वस्तू व सेवा कर इमारतीसाठी येणाऱ्या रु.१७५६.७० कोटी खर्चाच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. याबाबत वस्तू व सेवा कर विभागाकडून एमएमआरडीएशी समन्वय साधून कार्यवाही सुरु आहे.

---

## गोरेगाव (पूर्व) येथील राजीव गांधी नगर व भीमनगर भागातील संरक्षक भिंत धोकादायक झाली असल्याबाबत

**(४) ३८०७ (०५-०४-२०२०). श्रीमती विद्या ठाकूर (गोरेगाव) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोरेगाव (पूर्व) येथील राजीव गांधी नगर व भीमनगर भागातील संरक्षक भिंत धोकादायक झाली असून त्याठिकाणी राहणाऱ्या झोपडी धारकांच्या जिवीतास धोका निर्माण झाल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर झोपडीधारकांचे स्थलांतरण करण्याकरिता करण्यात येणारे सर्वेक्षण शासनामार्फत झाले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (०४-०१-२०२२) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही. प्रस्तुत प्रकरणी उपजिल्हाधिकारी (अति/निष्का), मालाड-३ या कार्यालयातील भूमापक, मे. महाऑनलाईनचे पर्यवेक्षक व म्हाडाचे सबंधित अधिकारी यांनी संयुक्त स्थळपाहणी केली आहे. सदर प्रकरणातील पात्र निवासी झोपडीधारकांना स्थलांतरीत करताना अपात्र तथा प्रलंबित निवासी झोपडीधारकांना देखील तात्पुरत्या स्वरुपावर दिनांक ३०.१०.२०२० पर्यंत आणिक येथील एस.जी.केमिकल्स अभिन्यासातील इमारतीत स्थलांतरीत करुन निष्कासनाची कार्यवाही सुरु करण्यात आली, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बोरिवली (पूर्व) मुंबई येथील सावरपाडा रस्त्याचा ताबा घेणेबाबत**

**(५) ४२४३ (०५-०४-२०२०). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बोरिवली (पूर्व) मुंबई येथील सावरपाडा रस्त्याचा ताबा घेणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ७ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास वारंवार प्रमुख अभियंता, विकास नियोजन, मुंबई महानगरपालिका, फोर्ट, मुंबई यांच्याकडे लेखी तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवेदनानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०३-०१-२०२२) :** (१) होय, बृहन्मुंबई महानगरपालिकेस निवेदन प्राप्त झाले आहे.
(२) व (३) न.भू.क्र.२२९५ (भाग), २२६२(भाग), २२६१ (भाग) आणि २३०१ (भाग) मौजे दहिसर या जागेवरील रस्त्याचे सुधारित संरेखन विकास योजना-२०३४ मध्ये अद्याप मंजूर व्हायचे असल्याने सदर जागेच्या भूसंपादन प्रस्तावामधील जागा अद्याप अधिसूचित करण्यात आलेली नाही.

शासनाने दि. ८/०५/२०१८ रोजीचे अधिसुचनेन्वये बृहन्मुंबई विकास योजना-२०३४ ला (सारभूत स्वरूपाचे फ़ेरबदल-ईपी वगळता) मंजूरी दिली असून ती दि.०१/०९/२०१८ पासून अंमलात आली आहे. त्यानुसार सदर जागा सारभूत स्वरूपाचा फ़ेरबदल क्र. EP-RC१२७ आणि EP-RC५७ मध्ये समाविष्ट असून सदर ई.पी. मध्ये सदर जागेवरील १३.४० मी. रुंद विकास नियोजन रस्त्याचे पूर्नसंरेखन (Realignment), जागेवरील सद्यस्थितीनुसार, दर्शविण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे.

बृहन्मुंबई विकास योजना-२०३४ मधील सारभूत स्वरुपांच्या फ़ेरबदलांवर संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य यांचेमार्फ़त छाननी सुरू असून त्यानुसार नगर रचना संचालनालयाचे अभिप्राय प्राप्त झालेनंतर शासनाची मंजूरी प्राप्त करून घेऊन EP मंजूरीची अधिसूचना शासन नगर विकास विभागातर्फ़े निर्गमित करण्याचे प्रस्तावित आहे. त्यानुसार, सदर ई.पी. ना शासनाची मंजूरी प्राप्त झाल्यानंतर सदर जागेच्या भूसंपादनाबाबतची कार्यवाही महापालिकेने करणे अभिप्रेत आहे.

---

## वसई (जि.पालघर) तालुक्यातील मुंबई-महानगर प्रदेश प्राधिकरणामार्फत करावयाच्या रस्त्यांच्या कामाबाबत

**(६) ६०८५ (०६-०४-२०२०). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) तालुक्यातील मुंबई-महानगर प्रदेश प्राधिकरणामार्फत रस्त्याची करावयाच्या कामासंबंधी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक १३ एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहु निवेदनातील प्रमुख मागण्या काय आहेत व त्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-१२-२०२१) : (**१) हे खरे आहे.

मा. क्षितीज हितेंद्र ठाकूर, वि.स.स. यांनी दि २५.०८.२०१६ व दि १३.०४.२०१७ च्या पत्रान्वये मा. मुख्यमंत्री महोदयांना निवेदन दिले आहे.

(२) निवेदनाद्वारे खालील मागण्या केलेल्या आहेत:

अ) विरार पश्चिम ते नालासोपारा पश्चिम हा रस्ता मुं.म.प्र.वि. प्राधिकरणाद्वारे विकसीत करणे (दि २५.०८.२०१६)

ब) भाईंदर खाडीवर पुल बांधणे (दि १३.०४.२०१४)

क) भाईंदर खाडीवरील पुलाच्या कामात मेट्रो रेल्वेसाठी लागणाऱ्या पुलाचा समावेश करुन मंजूर पुलाच्या कामासाठी लागणारा निधी उपलब्ध करून देणे (दि. १३.०४.२०१७)

सदर मागण्यांच्या अनुषंगाने खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे: (अनुक्रमे मागणी क्र. अ, ब, क नुसार)

अ) सदर पकल्प सक्षम प्राधिकाऱ्याकडे प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

ब) मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाच्या १४४ व्या बैठकीत रु १५०१.१६ कोटी इतक्या रकमेस सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. तथापि, सदर प्रकल्प संरक्षित प्रकल्पात मोडत असल्याने वन विभागाच्या मंजूरीसाठी अहवाल सादर करण्यात आला आहे. तसेच सदर पुलाच्या कामामध्ये बाधित होणाऱ्या ९.८६२५ हे. मिठागराची जमीन हस्तांतरीत करणे आवश्यक असल्याने मिठागार जमिनीचे मुल्यांकन करण्याकरीता व्हॅल्युअर यांची नेमणूक

करण्याबाबतचा प्रस्ताव औद्योगिक धोरण आणि प्रोत्साहन मंत्रालय, नवी दिल्ली यांचेकडे प्रलंबित आहे.
क) भाईंदर खाडीपुलाच्या कामामध्ये मेट्रो रेल्वे प्रकल्प पूलाचा समावेश करण्याबाबत नियुक्त केलेल्या सल्लागार मे. स्टुप कन्सल्टंट प्रा. लि. मार्फत सुसाध्यता अभ्यास (feasibility study) करण्यात आला होता व याबाबत सल्लागाराने ६ विविध पर्यायांचा अभ्यास केला आणि तात्रिकदृष्टया सुसाध्य नाही असे कळविले आहे, तथापि, प्राधिकरणाने मेट्रो मार्ग-१३ (मीरा भाईंदर ते वसई-विरार) चा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी मे. दिल्ली रेल कॉर्पोरेशन (DMRC) यांची सल्लागार म्हणून माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये नियुक्ती केली आहे. DMRC आणि प्राधिकरणाकडून संरेखन (alignment) बाबत संयुक्त पाहणी झालेली असून सदरचे काम प्रगतिपथावर आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोविड - १९ च्या तपासणीच्या निकषात केलेल्या बदलांमुळे कोरोनाबाधितांची संख्या कमी दिसून येत असल्याबाबत

**(७) ८८६३ (०३-०६-२०२०). श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल रिसर्चच्या (आय. सी. एम. आर.) दि.९ एप्रिल, २०२० रोजीच्या दिशादर्शक आदेशानुसार कोरोनाबाधित रुग्णांच्या संपर्कातील अति जोखमीच्या परंतु लक्षणे दिसून येत नसलेल्या (Asymptomatic direct and high risk contacts of a confirmed case) व्यक्तींची संपर्कात येण्यापासून ५ व्या दिवसापासून ते १४ व्या दिवसापर्यंत एकदा तपासणी करण्यात यावी, हे निर्देशित करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक १२ एप्रिल, २०२० रोजी उक्त निदेशांच्या विपरीत मुंबई महापालिकेने आदेश काढून त्यातील सी-१ अन्वये उपरोक्त प्रश्न भाग (१) मध्ये नमूद व्यक्तींची तपासणी करण्याची गरज नसल्याचे स्पष्ट केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दिनांक १५ एप्रिल, २०२० रोजी मुंबई महानगरपालिकेने पुन्हा आदेश काढून त्यातील डी-१ अन्वये अशा व्यक्तींची संपर्कापासून ५ व्या दिवशी निरीक्षण करून (म्हणजेच लक्षणे दिसली तरच) चाचणी करता येऊ शकेल, असे नमूद करून संभ्रमावस्थेत आणखीनच भर टाकली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाच्याच वैद्यकीय शिक्षण व औषधि द्रव्ये विभागाच्या दिनांक १८ एप्रिल, २०२० रोजीच्या अहवालातील आकृती क्रमांक १६ व १७ नुसार अनुक्रमे उपलब्ध केसेसचा विचार करता त्यापैकी ६३% केसेस व रुग्णालयात दाखल केसेसपैकी ७९ % केसेस या लक्षणे नसलेल्यांच्या (Asymptomatic) आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त सर्व वस्तुस्थिती विषद करून विधानसभा विरोधी पक्ष नेते यांनी त्यांच्या दिनांक १७ एप्रिल व १९ एप्रिल २०२० रोजीच्या पत्रान्वये मा.मुख्यमंत्री महोदयांना लक्षणे नसलेल्यांच्या (Asymptomatic) बाबतीत आय.सी.एम.आर.च्या निकषांचे तंतोतंत पालन करण्याबाबत व कोरोना पॉझिटिव्ह केसेसची संख्या कृत्रिमरीत्या कमी दाखवून रिपोर्टिंगमध्ये होत असलेला घोळ दूर करण्याबाबत विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, मुंबईतील महानगरपालिका रुग्णालये, शासकीय रुग्णालये, तसेच खाजगी प्रयोगशाळा मिळून मुंबईमध्ये प्रतिदिन किमान १०००० चाचण्या करण्याची क्षमता असतानाही केवळ प्रतिदिन ३००० ते ३५०० चाचण्या करण्यात आल्या असून दिनांक १३ ते २३ मे, २०२० या कालावधीत मुंबई महानगरपालिकेने केलेल्या ४३०२५ चाचण्यांपैकी १३८५३ चाचण्या पॉझिटिव्ह आल्या असून सदर प्रमाण ३२ टक्के असून हे सातत्याने वाढत आहे, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने आय. सी. एम. आर. च्या निकषांप्रमाणे कोव्हिड पॉझिटिव्ह रूग्णांचें उचित रिपोर्टिंग होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(८) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-१२-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दिनांक १५ एप्रिल, २०२० रोजीच्या परिपत्रकात, डी-१ अन्वये कोरोनाबाधीत रुग्णांच्या संपर्कातील अतिजोखमीच्या परंतु लक्षणे दिसून येत नसलेल्या व्यक्तींची संपर्कात आल्यानंतर चाचणी न करता त्यांचे विलगीकरण करावे असे नमूद केले असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) हे खरे आहे असे वैद्यकीय शिक्षण विभागाने कळविले आहे.

(५) अशा आशयाचे पत्र बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त झाले असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(६) दिनांक १३ ते २३ मे, २०२० या कालावधीत बृहन्मुंबई महानगरपालिकेने एकूण ३९,८०९ चाचण्या केल्या असून, त्यापैकी १३,२६३ चाचण्या पॉझिटीव्ह आल्या आहेत असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(७) कोविड रुग्णांचे उचित रिपोर्टींग होण्याच्या दृष्टीने आय.सी.एम.आर. कडून प्राप्त झालेल्या तत्वांचे तंतोतंत पालन केले जाते असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(८) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील सांताक्रुझ (पुर्व) येथील कलिना विधानसभा क्षेत्रातील विमानतळ प्रधिकरणाच्या जागेवरील प्रकल्प बाधितांचे स्थलांतरण करण्याबाबत**

**(८) ११४७५ (१०-०७-२०२०). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनील राणे (बोरीवली) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सांताक्रुझ (पुर्व) येथील कलिना विधानसभा क्षेत्रातील विमानतळ प्रधिकरणाच्या जागेवरील प्रकल्प बाधितांची पुर्नवसनाची सर्व्हेक्षणाची कार्यवाही पूर्ण होऊन परिशिष्ट-२ ची यादी तयार झालेली असतानाही तसेच झोपडीधारक विद्याविहार येथे स्थलांतरीत होण्यास तयार असतानाही अद्याप स्थलांतरणाबाबतची कार्यवाही करण्यास विलंब होत असल्याचे नुकतेच माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्या दरमयान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक लोकप्रतीनिधींनी झोपड्यांचे स्थलांतरण तातडीने करण्याबाबत संबधित विभागाशी सतत पाठपुरावा, पत्रव्यवहार, बैठका घेऊनही तसेच विधानसभा अधिवेशनात विविध आयुधांद्वारे शासनाचे लक्ष वेधूनही अद्याप शासन स्तरावर कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी तातडीने निर्णय घेण्याबाबत मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्याशी दिनांक ५ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्या सुमारास लोकप्रतीनिधींनी पत्रव्यवहार केलेला आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, उक्त झोपडीधारकांचे सर्व नागरी सुविधांसह कधीपर्यंत स्थलांतरण होणे अपेक्षित आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०१-२०२२) :**(१) व (२) छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या (CSMIA) अधिसूचित क्षेत्राच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमधील फेरबदलास महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम-१९६६ च्या कलम ३७(१कक)(ग) खाली मंजूरी देणेबाबत दिनांक २९ जून, २०२१ रोजी अधिसूचना प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर अधिसूचनेनुसार विमानपत्तन प्राधिकरणाच्या जागेवरील झोपडीधारकांच्या पुनर्वसनाची कार्यवाही मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर नियोजित आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) व (५) सदर झोपडपट्टी धारकांच्या पुनर्वसनासाठी सद्यस्थितीत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून प्रिमियर कंपाऊंड, कुर्ला (प), मुंबई येथील प्रत्यक्ष जागेवर बांधण्यात आलेली बांधकामे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून “जसे आहे तशा” स्थितीत हस्तांतरीत करुन घेणेबाबतची कार्यवाही करण्यात आली आहे. सदर झोपडपट्टी पुनर्वसनासाठी प्राप्त सदनिका राहण्यास योग्य व्हाव्यात, याकरीता दुरुस्तीचे काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाद्वारे हाती घेण्यात आले आहे.

___

## उल्हासनगर (जि. ठाणे) मधील कल्याण -अंबरनाथ सीसी रस्ता बनविण्याच्या कामाबाबत

**(९) ११६५३ (०६-०८-२०२०). श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील उल्हासनगर मधील कल्याण अंबरनाथ सीसी रस्ता बनविण्याचे काम एमएमआरडीए व महानगरपालिकेमार्फत सुरु असून काही ठिकाणी कामे प्रलंबित असून ही प्रलंबित कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्याची मागणी लोकप्रतिनिधी यांनी एमएमआरडीए आणि आयुक्त, महानगरपालिका यांच्याकडे दिनांक १९ मे, २०२० रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लोकप्रतिनिधी यांनी संबंधित विभागाकडे सदरचे काम तातडीने पूर्ण करावे अशी मागणी करूनही सदर विभाग दुर्लक्ष करीत असल्याने पावसाळ्यात मोठ्या प्रमाणावर अनेक ठिकाणी पाणी साचून जीवितहानी होण्याची तसेच दुकानात पाणी शिरून मोठ्या प्रमाणावर नुकसान होण्याचा धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरचे काम तातडीने करण्याबाबत शासनाने आणि महानगरपालिकेच्यावतीने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०१-२०२२) :** (१) होय हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) पावसाळ्यात पाणी तुंबू नये याकरिता रस्त्याच्या दोन्ही बाजूला पर्जन्य वाहिन्यांचे नियोजन करुन बांधकाम करण्यात आले आहे.

(४) कोविड-१९ च्या महामारीमुळे लॉकडाऊन दरम्यान मजुरांचा तुटवडा असल्याने कामाचा वेग मंदवला होता. सदरचे काम प्रगती पथावर असून पुर्णत्व: च्या अंतिम टप्प्यात आहे.

---

## नवी मुंबईतील वाशी-ठाणे व पामबीच या पहिल्या मार्गाचे तसेच वाशी ते बेलापूर या दुसऱ्या मार्गाचे काम सुरु करण्याबाबत

**(१०) १२०९९ (१०-०७-२०२०). श्री.गणेश नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रस्तावित नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, जेएनपीटी बंदराचा विस्तार, नैना क्षेत्र यामुळे भविष्यात दळणवळणाचा उदभवणारा प्रश्न यासाठी वाशी-ठाणे व पामबीच मार्गाला समांतर असा वाशी ते बेलापूर अशा दोन सागरी किनारी मार्गासंबधीचा प्रस्ताव नवी मुंबई महानगरपालिकेने एमएमआरडीएकडे सादर केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त दोन मार्गापैकी पहिल्या टप्प्यातील वाशी ते ऐरोली दरम्यानच्या कोस्टलरोडला एमएमआरडीने मान्यता दर्शवली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या मार्गाचे काम अद्यापी सुरु करण्यात आले नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वाशी-ठाणे व पामबीच या पहिल्या मार्गाचे तसेच वाशी ते बेलापूर या दुसऱ्या मार्गाचे काम सुरु करण्याबाबत शासनस्तरावरून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३), (४) व (५) नवी मुंबई महानगरपालिकेने वाशी ते ठाणे व वाशी ते बेलापूर अशा सागरी मार्गाचा पूर्व शक्यता अहवाल तयार करून घेतला आहे. सदर प्रकल्पाचे काम हाती घ्यावे म्हणून नवी मुंबई महानगरपालिकेने माहे जुलै, २०१८ मध्ये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास विनंती केली आहे. सदर रस्त्याचे काम सद्यस्थितीत प्राधिकरणांतर्गत प्रस्तावित नसल्याबाबत प्राधिकरणाने नवी मुंबई महानगरपालिकेस कळविले आहे.

---

**गोरेगाव (मुंबई) येथील पश्चिम द्रुतगती मार्गालगत असलेल्या सर्वोदयनगरमधील नागरिकांचे तसेच दुधसागर वसाहतीसमोरील खाजगी ट्रॅव्हल्स एजन्सींच्या दुकानांचे पुनर्वसन करणेबाबत**

**(११) १२४४८ (१९-०९-२०२०). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोरेगाव (मुंबई) येथील पश्चिम द्रुतगती महामार्गालगत असलेल्या दुधसागर वसाहतीसमोरील खाजगी ट्रॅव्हल्स एजन्सींच्या दुकानांमुळे या परिसरात मुंबई बाहेर जाणाऱ्या गाडया नेहमी थांबत असल्यामुळे तसेच या परिसरात असलेल्या सर्वोदयनगर झोपडपट्टीमधील नागरिकांच्या वर्दळ व अन्य वाहनांमुळे या परिसरात मोठया प्रमाणात वाहतुक कोंडी निर्माण होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या परिसरातून जाणारा पश्चिम द्रुतगती महामार्गाचा भविष्यात विस्तार करताना सर्वोदय नगरमधील नागरिकांची वस्ती हटविणे आवश्यक ठरणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सर्वोदय नगर येथील नागरिकांचे तसेच दुधसागर वसाहतीसमोरील खाजगी ट्रॅव्हल्स एजन्सींची दुकाने यांचे अन्य ठिकाणी पुनर्वसन करावे याकरिता तसेच सद्यस्थितीत या ठिकाणी होणारी वाहतुक कोंडी सोडविण्याठी तातडीने उपाययोजना करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे वारंवार निवेदने सादर केली आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू निवेदनांवर कोणती कार्यवाही करण्यात आली व निवेदनांच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या कार्यवाहीचा तपशील काय आहे,
(५) असल्यास, सदरहू ठिकाणच्या नागरिकांचे व दुकानांचे पुनर्वसन करण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे व या प्रकरणी केव्हापर्यंत कार्यवाही सुरू करण्यात येणार आहे, तसेच येथील वाहतुक कोंडी सोडविण्याबाबत शासन कोणत्या उपाययोजना करणार आहे वा करित आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-१२-२०२१) :** (१) हे खरे आहे असे गृह विभागाने कळविले आहे.

(२) सदर जागेतील पश्चिम द्रुतगती महामार्गाचे रुंदीकरण संपूर्ण संपादीत झालेल्या जागेवर झाले असल्याचे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने कळविले आहे.

(३) व (४) वाहतुक विभागाकडून सदर परिसरात पोलीस अधिकारी व अंमलदारांची नेमणुक करुन वाहतुक सुरळीत केली जाते.

वाहतुक अडथळा करुन वाहतुक कोंडी निर्माण करणाऱ्या वाहनांवर मोटार वाहन कायद्यांतर्गत दंडात्मक कारवाई केली जाते.

तसेच सकाळच्या वेळी दहिसरकडून मुंबई दक्षिण वाहिनीवर जास्त प्रमाणात वाहतुकीची वर्दळ असल्याने वाहतुक कोंडी टाळण्यासाठी आरे जंक्शनवरील सिग्नल हा नियमितपणे न चालविता तो मानव नियंत्रित चालविण्यात येत असतो असे गृह विभागाने कळविले आहे.

(५) व (६) पश्चिम द्रुतगती महामार्गालगतचा १८.३० मी. रुंदीच्या विकास नियोजित रस्ता हा विकसित झालेला नसून, तो बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ताब्यात नाही.

सदर १८.३० मी. रुंदीच्या विकास नियोजित रस्त्याच्या जागेवर सर्वोदय नगर ही वस्ती आहे. सदर रस्त्याची जागा ही डेअरी विकास आयुक्त यांच्या मालकीची आहे. सदर १८.३० मी. रुंदीच्या विकास नियोजित रस्त्याचे सर्वेक्षण करुन सीमांकन प्राप्त केल्यानंतर सदर रस्त्याचा विकास करता येईल असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

---

## मीरा भाईदर (जि.ठाणे) येथील अनेक नैसर्गिक नाल्यात भराव टाकल्याने झालेले नुकसान

**(१२) १३६०७ (१४-०९-२०२०). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मीरा भाईदर (जि.ठाणे) येथील अनेक नैसर्गिक नाल्यात भराव केल्याने शेतामध्ये पाणी साचून पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्याअनुषंगाने नैसर्गिक नाल्यात भराव टाकणाऱ्या संबंधित नागरीकांवर व त्यांना अभय देणाऱ्या पालिका प्रशासनावर कारवाई करुन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या पिकांचे पंचनामे करून नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२३-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात एकूण १५५ कच्चे/पक्के नाले आहेत. सदर नाल्यांची सफाईची कामे पावसाळ्यापुर्वी माहे जून, २०२० मध्ये पूर्ण करण्यात आली असल्याने नाल्यातील भरावामुळे शेतात पाणी साचून पिकांचे नुकसान झाले, अशी वस्तुस्थिती नाही.
यासंदर्भात शेतकऱ्यांकडून कोणतीही तक्रार महानगरपालिकेस प्राप्त झाली नसल्याचे, मिरा-भाईंदर महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोरोनाचा संसर्ग रोखण्यासाठी महानगरपालिकांना निधी उपलब्ध करून देण्याबाबत**

**(१३) १३८७० (१६-०७-२०२०). श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोरोनाचा संसर्ग सर्वदूर होत असतानाच तो मुंबई महानगरपालिका, एम एम आर क्षेत्रातील महानगरपालिका, पुणे, पिंपरी-चिंचवड, मालेगाव, नागपूर अशा महानगरपालिका क्षेत्रांमध्ये विशेषत: वाढत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या वाढत्या प्रसाराचा प्रभावीपणे सामना करण्यासाठी महानगरपालिकांना पीपीई किट्स, मास्क, टेस्टिंग लॅब्स, व्हेंटिलेटर्स, ऑक्सिजन पुरवठा करणारी यंत्रणा, रुग्णवाहिका या सारख्या सुविधा वाढत्या प्रमाणात उपलब्ध कराव्या लागत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महानगरपालिकांना त्यासाठी शासनाकडून निधी देण्याची आवश्यकता असून सद्यस्थितीत या महानगरपालिकांना शासनाकडून निधी देण्यात आलेला नाही अथवा अत्यंत तुटपुंजा निधी देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या महानगरपालिकांना भरीव निधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०३-०१-२०२२) :** (१), (२), (३), (४) व (५)
• राज्यातील वाढता कोरोनाचा संसर्ग विचारात घेऊन त्यावर तात्काळ उपाययोजना करण्यासाठी "महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोयी सुविधांच्या विकासासाठी तरतुद" योजनेअंतर्गत राज्यातील एमएमआर क्षेत्रातील महानगरपालिकांना रुपये ३५.०० कोटी निधी वितरीत करण्यात आला आहे.
• तसेच कोविड-१९ च्या प्रादुर्भावर त्वरीत उपाय योजना करण्याच्या अनुषंगाने "एक विशेष बाब" म्हणून सदर निधीबाबत प्रशासकीय मान्यतेचे अधिकार महानगरपालिका आयुक्त देण्यात आले आहेत.

---

**मरीन लाईन्स (मुंबई) येथे पुनर्वसन प्रकल्पांतर्गत उभारण्यात येत असलेल्या इमारतीमध्ये पात्र सदनिकाधारकांची फसवणूक करण्यात येत असल्याबाबत**

**(१४) २०२९९ (२५-१२-२०२०). अॅड.राहुल नार्वेकर (कुलाबा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील जगन्नाथ शंकर शेठ मार्ग, म्युनिसिपल शाळेसमोर, मरीन लाईन्स (मुंबई) येथे अजमेरा सिटीस्केप व आलमदार इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. या दोन खाजगी विकासकांमार्फत पुनर्वसनाच्या नावाखाली त्या जागेवरील मूळ सदनिकाधारकांकडून सदर जागा रिक्त करुन मरीन पॅलेस या नवीन इमारतीचे बांधकाम करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या जागेवर उभारण्यात येणा-या इमारतीमध्ये मूळ सदनिकाधारकांना प्राधान्याने सदनिका उपलब्ध करुन देण्याऐवजी विकासकांमार्फत सदनिका कोटयवधी रुपयांना खाजगीरित्या विक्री करण्यात येत असून पात्र सदनिकाधारकांची फसवणूक करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर इमारतीचे बांधकाम करताना चटई क्षेत्र निर्देशांकाचा चुकीच्या पध्दतीने वापर करुन तसेच मंजूर आराखडयानूसार इमारतीचे बांधकाम करण्यात येत नसल्याची बाबही माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुळ सदनिकाधारकांना वगळून सदनिका वाटपात गैरकारभार करुन स्वत:चा आर्थिक फायदा करणा-या व चटई क्षेत्र निर्देशांकाचा चुकीच्या पध्दतीने वापर करुन शासनाचे लाखो रुपयांचे महसुल बुडविणा-या संबंधित विकासकांना काळया यादीत टाकून त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करुन कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही करणार वा करित आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (१४-१२-२०२१) :**(१) हे खरे नाही.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अहवालानुसार, अजमेरा सिटीस्केप यांना पुनर्विकासाकरीता ना-हरकत प्रमाणपत्र प्रदान केल्याचे कार्यालयीन अभिलेखातुन दिसत नाही, तथापि इमारत क्र.७, ७ ए, ७एए, १३बी,७ बीसी आणि ७ डी जुनी वाडिया बिल्डींग या उपकरप्राप्त इमारती असून सदर इमारतींच्या पुनर्विकासाच्या प्रस्तावानुसार मे. आलमदार इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांना विकास नियंत्रण नियमावली ३३(७) अंतर्गत मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळातर्फे दि.३०.११.२०१२ द्वारे ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आले.

सद्य:स्थितीत इमारत पुनर्विकासाचे काम पूर्ण झाले असुन मे. आलमदार इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांनी तळ+२० मजले अशी नविन इमारत पुनर्वसनासाठी तसेच विक्री करणेकामी बांधली आहे. तद्नंतर विकासकाने त्यांचे पत्र दि.१२.११.२०२० अन्वये इमारतीचे काम पूर्ण झालेले असल्याने बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे पूर्ण भोगवटा प्रमाणपत्र (Occupation Certificate) प्राप्त होण्यास्तव मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे ना-हरकत प्रमाणपत्र मिळण्यासाठी विनंती अर्ज दाखल केला. त्यानंतर दि.०३.१२.२०२० रोजी कार्यकारी अभियंता/सी-

३ विभाग, दुवपु मंडळ, यांनी बांधलेल्या इमारतींची प्रत्यक्ष पाहणी करुन एकूण ७९ भाडेकरु/रहिवाशांपैकी ७२ भाडेकरु/रहिवाशांना ताबा दिलेला आहे, याची खातरजमा केली. त्यास अनुसरुन उर्वरीत ०७ भाडेकरु/रहिवाशी जेव्हा येतील तेव्हा त्यांना तात्काळ ताबा देणे विकासकास बंधनकारक राहिल हया अटीवर पूर्ण भोगवटा प्रमाणत्र (Occupation Certificate) मिळण्यास्तव ना-हरकत प्रमाणपत्र क्र.१६६, दि.०४.०१.२०२१ अन्वये मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळातर्फे देण्यात आलेले आहे.

(२) हे खरे नाही,

विषयांकित इमारतीचे पुनर्विकासाचे काम पुर्ण झाले असून, कार्यकारी अभियंता/सी-३ विभाग, दुवपु मंडळातील कार्यकारी अभियंता व उप अभियंता यांनी दि.०३.१२.२०२० रोजी भेट दिली असून त्यावेळी नाहरकत प्रमाणपत्रधारक तसेच उपकरप्राप्त इमारतीचे पात्र भाडेकरु/रहिवाशी यांच्या प्रमाणित यादीमधील नोंदीनुसार त्यांना गाळयांचा ताबा देण्याची व नोंदणीकृत करारनामा करण्यात आल्याची खातरजमा कार्यकारी अभियंता/सी-३ विभाग, दुवपु मंडळामार्फत करण्यात आली आहे. सदर कार्यवाहीच्या वेळी कोणत्याही भाडेकरु/रहिवाशी यांनी तक्रार नोंदवलेली आढळुन येत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) नवनगर विकास प्राधिकरणाकडे असलेले मोकळे भूखंड अतिक्रमणमुक्त करण्याबाबत**

**(१५) २०३६६ (१८-०१-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) नवनगर विकास प्राधिकरणाकडे अनेक मोकळे भूखंड कोणत्याही लोकोपयोगी कामासाठी उपयोगात न आणता दीर्घकाळापासून विकासाआभावी पडून आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाकडील अनेक शासकीय भूखंडावर मोठ्या प्रमाणावर पक्क्या स्वरूपाचे व तात्पुरत्या स्वरूपाचे अतिक्रमण झाले असल्याचे दिसून येते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या ताब्यातील मौजे वाकड स.नं.२०८/२०९ हा काळेवाडी फाटा या दाट लोकवस्तीच्या भागातील मोठा भूखंड अनेक वर्षे विनावापर पडून असल्याचे निदर्शनास आले असून सदर मोकळ्या भूखंडावर क्रीडा संकुल, उद्यान, सांस्कृतिक केंद्र यासारख्या लोकोपयोगी कार्यासाठी महानगरपालिका प्रशासनाने उपयोगात आणावा याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधी, सामाजिक संस्था व परिसरातील नागरिक यांनी वेळोवेळी महानगरपालिका प्रशासन आणि तत्कालीन मुख्यमंत्री व नवनगर विकास प्राधिकरण यांना दिनांक ९.३.२०१९ रोजी वा त्या सुमारास विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर शासकीय भूखंड समाजोपयोगी कार्यासाठी वापरण्याकरिता शासनाकडून महानगरपालिका प्रशासनाकडे हस्तांतरित करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०१-२०२२) : (**१) होय, अशंत:खरे आहे.

(२) होय, अशंत:खरे आहे.

(३) होय, खरे आहे.

मौजे वाकड,सर्व्हे नं.२०८ व २०९ या प्राधिकरण संपादित जमिनीवर मा.मुंबई उच्च न्यायालयात भूमीसंपादन,पुर्नवसन व पुर्नस्थापना करताना उचित भरपाई मिळणेबाबत आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ मधील कलम २४ (२) अन्वये प्रलंबित न्यायालयीन दाव्यांमुळे जागा वाटप/जागेचा विकास करणे प्रलंबित आहे.

(४) प्राधिकरण भू वाटप नियमावली १९७३ मधील तरतूदीनुसार व या भूवाटप नियमावलीच्या अनुषंगाने विकास प्राधिकरण सभेच्या निर्णयानुसार सार्वजनिक सुविधेचे भूखंडाचे वाटप केले जाते.

(५) अतिक्रमण बाधित क्षेत्राचे व न्यायालयीन दाव्यामध्ये बाधित क्षेत्राचे वाटप करता आलेले नाही.

---

**वांद्रे (पूर्व) मुंबई येथील एमआयजी क्लब व्यवस्थापनाने म्हाडा सोबत झालेला कराराचा भंग केल्याबाबत**

**(१६) २०३८३ (२२-०३-२०२१). श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांद्रे (पूर्व) मुंबई येथील एम.आय.जी. क्लब व्यवस्थापन व म्हाडा यांचेमध्ये सन २००४ मध्ये करार होवून वांद्रे येथील शाळेकरिता आरक्षित असलेला ३६५० चौ.मी. भूखंड एम.आय.जी व्यस्थापनास भाडेकराराने देण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कराराच्या अनुषंगाने एम.आय.जी. क्लब व्यवस्थापनाने या जागेवरील शाळेची इमारत बांधून देणे आवश्यक असताना अद्यापपर्यंत सदर क्लबने शाळेच्या इमारतीचे बांधकाम न करता कराराचा भंग केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी कराराचा भंग केल्याप्रकरणी संबंधित क्लबला माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान दंडाची नोटीस बजावण्यात आली असता त्यावर क्लबने सादर केलेल्या खुलाशाच्या अनुषंगाने कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे व त्याचा तपशील काय आहे,

(४) असल्यास, अद्याप या प्रकरणी कोणतीच कारवाई झालेली नसल्यास या प्रकरणी चौकशी करून कराराचा भंग केल्यामुळे सदरहू करार रद्द करून सदरहू भूखंड पुन:श्च शासनाच्या ताब्यात घेऊन संबंधित क्लबविरूध्द तसेच सदर प्रकरणी विलंबास जबाबदार असणारे दोषी

अधिकारी / कर्मचारी यांचेवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच संबंधित क्लबकडून दंडाच्या रकमेची वसूली व सदरहू भूखंड शासनाच्या ताब्यात किती कालावधीत घेण्यात येणार आहे, याबाबत शासनाची नेमकी भूमिका काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (३०-१२-२०२१) :** (१) व (२) हे खरे आहे .
(३), (४) व (५) म्हाडा, प्राधिकरण ठराव क्र.६८१४, दि.२४.०१.२०१९ अन्वये एम.आय.जी. क्लब यांच्याकडून दंडात्मक रक्कम रु.५३.६५ कोटी वसूल करण्यास दिलेल्या मान्यतेनुसार, मुंबई मंडळाने त्यांच्या दि.१२.०३.२०१९ रोजीच्या पत्रान्वये सदरहू रकमेचा भरणा करण्याबाबत उक्त क्लबला नोटीस बजावलेली आहे.

सदरहू नोटीस रद्द करण्याबाबत क्लबने मुंबई मंडळास त्यांच्या दि.२१/०५/२०१९ च्या पत्रान्वये कळविले आहे. तथापि, सदरहू क्लबने सादर केलेला खुलासा संयुक्तिक नसल्याने, उक्त खुलासा अमान्य करून, रु.५३.६५ कोटी रक्कम दि. १२.०४.२०१९ पासून १३.५०% व्याजासह भरण्याबाबत मुंबई मंडळाच्या दि.१०.०६.२०२१ रोजीच्या पत्रान्वये सदरहू क्लबला कळविण्यात आले आहे.

---

## दादर (मुंबई) येथील 'छप्रा' व 'मोहसीन' इमारतीतील रहिवाश्यांची विकासक फसवणूक करीत असल्याबाबत

**(१७) २१७७७ (२२-०३-२०२१). श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दादर (मुंबई) येथिल 'छप्रा' व 'मोहसीन' या दोन इमारतींच्या पुनर्विकासाकरिता मे. शुभं इंटरप्रायझेस या विकासकाला म्हाडातर्फे १७ मार्च, २००७ रोजी वा त्या सुमारास, ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आले, परंतु अद्यापपर्यंत पुनर्विकासाचे काम पूर्ण झालेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गत ६-७ वर्षापासून सदर रहिवाश्यांना तात्पुरत्या स्थलांतराच्या भाड्याची रक्कमही मिळालेली नसून सदर इमारतीतील रहिवाश्यांनी विकासकास नव्याने संमतीपत्रे द्यावीत त्यानंतर भाड्याचे धनादेश देण्यात येतील असे सांगून संमतीपत्रे घेवून तात्पुरत्या निवासाकरिता भाड्याचे धनादेश दिले परंतु सदर धनादेश वटले नसल्याने विकासकाने फसवणूक केल्यामुळे सदर रहिवाशी आर्थिक अडचणीत आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास सदर इमारतींच्या रखडलेल्या पुनर्विकासामुळे रहिवाश्यांना होत असलेल्या अडचणींबाबत स्थानिक लोकाप्रतिनिधिनी वारवांर शासनाच्या निदर्शनास आणूनही याबाबत कोणतीही कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले व तद्नुसार उपरोक्त दोनही इमारतींच्या पुनर्विकासाचे काम म्हाडातर्फे पुर्ण करण्याबाबत तसेच विकासकावर कारवाई करून रहिवाश्यांचे पुनर्वसन होईपर्यंत विक्रीच्या इमारतीतून वसुली करून रहिवाश्यांना भाड्याची रक्कम अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (१३-१२-२०२१) :** (१) होय हे खरे आहे.
सद्य:स्थितीत विकासकाने सदरहू काम अर्धवट अवस्थेत सोडलेले आहे.
(२) होय हे खरे आहे.

भाडेकरु / रहिवाश्यांनी त्यांच्या दि.२१.०२.२०१९ रोजीच्या पत्राद्वारे मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळास कळविल्यानुसार विकासकाने इतर संस्थांकडुन (मे.परमेश्वरी एलएलपी) न वटणारे धनादेश घेऊन, भाडेकरु/ भोगवटादारांना सन २०१८ मध्ये दिले होते. जवळ जवळ ७० भाडेकरु/रहिवाश्यांची फसवणुक केली असे कळविले आहे.
(३) सदर बाब स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी वेळोवेळी मंडळाच्या निदर्शनास आणली आहे.

शासनाने दि.०७.०६.२०२१ रोजीच्या पत्राद्वारे मंडळास कळविले आहे की, अश्या अर्धवट सोडलेल्या प्रकल्पाचे भूसंपादन करण्याची तरतुद म्हाडा अधिनियम १९७६ मध्ये सद्य:स्थितीत नसल्याने, छप्रा व मोहसीन बिल्डींग या इमारतीचे भुसंपादन करता येणार नाही, असे अभिप्राय विधी व न्याय विभागाने दिले आहे. तसेच ज्या उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासासाठी ना-हरकत प्रमाणपत्र दिली आहेत व अशा इमारती पाडण्यात आल्या, परंतु नवीन इमारतींचे बांधकाम अर्धवट अवस्थेत विकासकाने सोडले आहेत, अशा प्रकल्पाचे भूसंपादन करण्याची तरतुद म्हाडा अधिनियम, १९७६ मधील कलम ९१-अ मध्ये करण्यात येत असून, याबाबतचे विधेयक मा.राष्ट्रपती महोदयांच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आलेले आहे.
(४) म्हाडा अधिनियम, १९७६ मधील कलम ९१-अ मध्ये करण्यात आलेल्या सुधारणा अंतिम मंजूरी प्राप्त झाल्यानंतर, मंडळातर्फे उर्वरित काम पूर्ण करण्याची कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई घाटकोपर येथे मजुर संस्थेने म्हाडाच्या मान्यतेने प्रत्यक्ष काम न करता विकास कामाचा निधी हडप केल्याबाबत

**(१८) २७८३१ (१८-०६-२०२१). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई (घाटकोपर) येथील म्हाडाच्या, मुबंई झोपडपट्टी सुधार मंडळ शहर यांचे मान्यतेने, मजुर संस्थेने प्रत्यक्षात शौचालय, रस्त्याचे काम न करताच कोरोना काळाचा लाभ घेऊन परस्पर देयक मंजुर करुन विकास कामाचा निधीचा गैरव्यवहार केल्याप्रकरणी प्राप्त तक्रारीनुसार मा.म्हाडा उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दि. २ एप्रिल, २०२१ चौकशीचे आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास करोना काळात मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ शहर यांना विकास कामे करण्याकरिता आता पर्यंत सुमारे २०० कोटी रुपये निधी उपलब्ध करुन दिला असल्याने उक्त निधीच्या योग्य वापराबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, चौकशीच्या अनुषंगाने सबंधित दोषी विरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (२९-१२-२०२१) :** (१)होय, हे खरे आहे.

(२) व (३) खासदार स्थानिक विकास कार्यक्रम निधी अंतर्गत सिध्देश्वर सहकार शेजार समिती, रामनगर (ब) येथे ६ सिटचे शौचालय बांधकाम न करता देयक अदा केल्याची तक्रार उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा यांचेकडे प्राप्त झाली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा यांनी चौकशी करण्याचे आदेश दिले. कोरोना काळामध्ये शौचालयाचे काम झाले नसल्याचे निदर्शनास आल्यानंतर सबंधित ठेकेदारास शौचालय बांधण्याच्या सूचना देण्यात आल्या. तद्नंतर प्रस्तुत प्रकरणाशी सबंधित कार्यकारी अभियंता, उप अभियंता व शाखा अभियंता यांचेकडून खुलासा प्राप्त झाला असून, त्यानुसार पुढील कार्यवाही म्हाडाकडे सुरु आहे. सद्य:स्थितीत शौचालयांचे काम पूर्ण झाले असून, दि. ११.७.२०२१ रोजी त्यांचे लोकार्पण करण्यात आले आहे.

तसेच सन एप्रिल, २०२० ते मार्च, २०२१ या कोरोना कालावधीत आमदार स्थानिक विकास कार्यक्रम व जिल्हा नियोजन मंडळ यांचेकडून मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळास रुपये ७४५.१२ कोटी निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. यापैकी रुपये १७४.०३ कोटीची कामे पूर्ण करण्यात आली असून, उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत. सदरच्या विकास कामांवर मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाच्या सबंधित अभियंता यांची देखरेख असते. म्हाडाच्या गुणनियंत्रण व दक्षता विभागामार्फत वेळोवेळी काही कामांची तपासणी करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कोलगांव -विसापूर (ता.बल्लारपूर जि. चंद्रपूर ) येथील शेतकऱ्यांना जमिन अधिग्रहणाचा मोबदला मिळण्याबाबत

**(१९) २७९४९ (१२-०६-२०२१). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोलगांव -विसापूर (ता.बल्लारपूर जि. चंद्रपूर ) येथील (प्रजिमा ११३) या रस्त्यावरील वर्धा नदीवरील मोठया पुलाचे व रस्त्याचे बांधकामासाठी शेतक-यांना जमिनीचे अधिग्रहण करून मोबदला देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. उपविभागीय अधिकारी बल्लारपूर यांना दिनांक १७.५.२०२०२१ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (१४-१२-२०२१) : (**१) होय, हे खरे आहे.

(२) कोलगांव ते विसापूर हा रस्ता प्रजिमा क्र. ११३ असून या रस्त्याकरीता भूसंपादनाची आवश्यकता असून सदर काम सन २०२१-२२ अर्थसंकल्पिय अधिवेशनामध्ये समाविष्ट करण्यात आले आहे. उपविभागीय अधिकारी यांनी कळविल्यानूसार, कायदेशीर शोध अहवाल

प्राप्त करण्याची कार्यवाही सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सुरु आहे. त्याचप्रमाणे खातेदारांचे संमतीपत्र/शपथपत्र प्राप्त करुन घेण्याकरीता ग्राम पंचायत कार्यालय, विसापूर येथे संबंधित लाभार्थ्यांची दि.०९/०६/२०२१ रोजी सभा घेण्यात आली. कायदेशीर शोध अहवाल तसेच संबंधीत खातेदाराची संमती / शपथपत्र प्राप्त होताच ते उपविभागीय अधिकारी तथा विशेष भुसंपादन अधिकारी, बल्लारपूर यांना सादर करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईत झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्पात एसआरए कायद्यातील कलम ३-क (१) या सुधारीत कलमात शासनाने नव्याने सुधारणा केल्याबाबत.**

**(२०) २७९६९ (१८-०६-२०२१). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्पात एसआरए कायद्यातील कलम ३-क (१) या सुधारीत कलमात सबंधित भुखंड झोपडपट्टी क्षेत्र घोषीत झाल्याशिवाय इरादा पत्र दिले जाऊ नये अशी शासनाने दि.११-५-२०२१ रोजी नव्याने सुधारणा केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास उक्त ३-क (१) या एसआरए कायद्यातील कलमात शासनाने नव्याने सुधारणा करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त कायद्यात सुधारणा केल्यानंतर एसआरए विभागात आतापर्यंत किती प्रस्ताव सादर होऊन झोपडपट्टी क्षेत्र घोषीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (२७-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई महापालिकेने शालेय पोषण आहार आहाराचे बचत गटांना दिलेल्या कंत्राटाबाबत**

**(२१) २८२०५ (१८-०६-२०२१). श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महापालिकेने आपल्या शाळांमधील इयत्ता १ ली ते ८ वीच्या वर्गातील विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत शिजवलेल्या अन्नाचा पुरवठा करण्यासाठी महिला बचत गटांना तब्बल २२३ कोटी ६३ लाखांचे कंत्राट देण्याचा निर्णय घेतला असल्याची बाब माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईत गतवर्षी मार्चमध्ये कोरोनाचा पहिला रुग्ण सापडल्यानंतर टाळेबंदी लागू केल्यानंतर पोषण आहार वाटप न केल्याने शिल्लक राहिलेल्या निधीचा अहवाल बचत गटांनी सादर केला आहे काय,

(३) असल्यास, आता पुन्हा दुसरी लाट सुरु झाल्यामुळे टाळेबंदी करण्यात आली असतानाही शालेय पोषण आहारावर तात्काळ निधी खर्च करण्याची सर्वसाधारण कारणे काय,
(४) असल्यास, या अनुषंगाने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-१२-२०२१) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिका परिक्षेत्रातील शाळांमध्ये शालेय पोषण आहार पुरवठा करण्यासाठी केंद्रीय स्वयंपाकगृहाच्या नियुक्तीसाठी दिनांक १२.०६.२०१९ ते दिनांक ०२.०८.२०१९ या कालावधीत स्वारस्याची अभिव्यक्ती अंतर्गत भाग घेतलेल्या संस्थांची शासनाने विहित केलेल्या अटी व शर्तीनुसार गुणवत्तेनुसार पात्र ठरलेल्या संस्थांची निवड करण्यासाठी स्थायी समितीच्या दिनांक ०५.०५.२०२१ रोजीच्या ठरावान्वये मंजुरी प्राप्त झाल्यानंतर संस्थांची नियुक्ती करण्यात आली असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(२) कोरोना प्रादुर्भावामुळे दिनांक १६ मार्च, २०२० पासून शाळा बंद करण्यात आल्यामुळे शालेय पोषण आहार योजनेंतर्गत शिजविलेल्या आहाराचा पुरवठा बंद करण्यात आला आहे.
पुरवठा केलेल्या देयकाची रक्कम प्राथमिक शिक्षण संचालनालय, पुणे यांचेमार्फत थेट शाळेत जमा करण्यात आली आहे. तसेच, दिनांक १६ मार्च, २०२० च्या पुढील अनुदान यापूर्वी कार्यरत संस्थांना दिलेले नसल्याने त्यांच्याकडे शिल्लक राहिलेल्या निधीचा अहवाल सादर करण्याचा प्रश्न उद्भवत नाही असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) व (४) केंद्र शासनाच्या दिनांक ३१ जुलै, २०२० रोजीच्या पत्रानुसार, कोविड-१९ विषाणु प्रादुर्भावामुळे शाळा बंद असल्यातरी विद्यार्थ्यांना पौष्टिक अन्न मिळणे आवश्यक असल्याने अन्न सुरक्षा भत्याच्या रकमेमधून विद्यार्थ्यांना कोरडा आहार देण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार केंद्र शासनाने राज्यास निधी मंजूर केला आहे.
सद्य:स्थितीत राज्यातील विद्यार्थ्यांना तयार आहारऐवजी कोरडा शिधा स्वरुपात शालेय पोषण आहार योजनेचा लाभ देण्यात आहे असे शालेय शिक्षण विभागाने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अंजनगाव-सुर्जी (जि. अमरावती) अंतर्गत वृक्ष लागवडीत झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(२२) २९०३५ (१२-०६-२०२१). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंजनगाव सुर्जी (जि.अमरावती) येथील सामाजिक वनीकरण परीक्षेत्राच्या नावीन्यपूर्ण योजनेअंतर्गत सैदापूर, खिरगव्हाण, सोनगाव या सात हेक्टर क्षेत्रावर ७७७७ रोपांची लागवड केली असल्याचे कागदोपत्री दर्शविण्यात आले असल्याचे माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त रोपांपैकी फक्त १७% रोपे जीवंत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) उपरोक्त गैरप्रकाराच्या अनुषंगाने संबंधित वनाधिकाऱ्यांसह वरिष्ठ अधिकाऱ्यांचीही खातेनिहाय चौकशी करण्यात यावी, अशी शिफारस जिल्हाधिकारी, अमरावती यांनी विभागीय आयुक्तांकडे केली असल्याचे माहे एप्रिल, २०२१ रोजी वा दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उद्धव ठाकरे (२१-१२-२०२१) : (**१)हे खरे नाही.

अमरावती, सामाजिक वनीकरण विभागांतर्गत, अंजनगाव सुर्जी वनपरिक्षेत्रामध्ये सन २०१९ च्या पावसाळयात भरीव वनीकरण योजनेंतर्गत (४४०६ ०४९२) सैदापूर, खिरगव्हाण, सोनगाव या रोपवन स्थळावर सात हेक्टर ¨ई° वर्ग क्षेत्रावर ७७७७ रोपांची प्रत्यक्षात लागवड केली आहे.

(२) हे खरे नाही.

लागवड केलेल्या रोपांपैकी मे, २०२१ मध्ये ४७०० रोपे जिवंत असून, जिवंत रोपांची टक्केवारी ६०.४३ टक्के इतकी आहे.

३)जिल्हाधिकारी, अमरावती यांनी दि. १५.०४.२०२१ रोजीच्या पत्रान्वये विभागीय आयुक्त, अमरावती यांना सदर प्रकरणी उप विभागीय अधिकारी, दर्यापूर यांनी दिलेल्या अहवालानुसार संबंधितांविरुध्द खातेनिहाय चौकशी सुरु करण्याची शिफारस करण्यात येत आहे, असे कळविले होते.

विभागीय आयुक्त, अमरावती यांनी दि. १७.०५.२०२१ रोजीच्या पत्रान्वये "सदर योजना ज्या विभागाशी संबंधित आहे त्यांचेकडे प्रस्ताव सादर करणे उचित राहील" असे मत नोंदवून प्रस्ताव जिल्हाधिकारी, अमरावती यांचेकडे परत केला. तदनंतर जिल्हाधिकारी, अमरावती यांच्या दि. ८.०७.२०२१ च्या पत्रान्वये प्रस्ताव वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, अमरावती यांचेकडे उचित कार्यवाहीस्तव पाठविण्यात आला.

(४) विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण, अमरावती यांच्या कार्यालयाकडे प्राप्त दि. २४.१२.२०१९ रोजीच्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने केलेल्या चौकशीअंती, वनक्षेत्रपाल (सामाजिक वनीकरण), अंजनगाव सुर्जी श्री. गावंडे यांनी कामामध्ये सुधारणा करून त्रुट्यांची दुरूस्ती केलेली असून रोपवन कामावर झालेला खर्च हा मंजुर आर्थिक तरतुदीपेक्षा जास्त नसल्याचे तसेच दि. ४.०१.२०२० च्या पुर्न:तपासणीमध्ये रोपवनामध्ये ७४.४१ टक्के रोपे जिवंत असल्याचे नमूद केलेले आहे. मात्र, श्री. गावंडे यांनी रोपवनातील कामे विहित कालावधीत पार पाडण्यामध्ये तसेच कामावर नियंत्रण ठेवण्यामध्ये कसूर केल्याचे आढळल्याने त्यांना दि. २६.०६.२०२० रोजी सेवापुस्तक ताकीद देण्यात आलेली आहे.

(५) प्रश्नच उद्भवत नाही.

---

**मुंबई शहरातील “दि ललित” या पंचतारांकित हॉटेलमध्ये त्यांच्या हॉटेल पॅकेजमध्ये कोविड लस दिली जात असल्याबाबत**

**(२३) २९२६२ (१३-०६-२०२१). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील “दि ललित” या पंचतारांकित हॉटेलमध्ये त्यांच्या हॉटेल पॅकेजमध्ये कोविड लस दिली जात असल्याचे माहे मे २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर हॉटेलमध्ये महापौर यांनी पाहणी केली असता कोल्ड चेन मेन्टेन केली जात नसून घरगुती वापराच्या फ्रीजमध्ये कोविड लसीचा साठा करण्यात आला असल्याचे निदर्शनास आले असून, ‘द ललित’ या हॉटेलमध्ये क्रिटीकेअर रुग्णालयाच्या माध्यमातून लस दिली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची संपूर्ण चौकशी केली जाणार असून क्रिटीकेअर रुग्णालयाचीही चौकशी केली जाणार असल्याचे महापौरांनी सांगितले असून, अशा हॉटेलांवर कारवाई करण्याचे आदेश केंद्र शासनाने राज्य शासनाला दिलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, सदर चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील अशा हॉटेलावर व ज्या रुग्णालयाच्या माध्यमातून लस दिली जाते अशा रुग्णालयांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-१२-२०२१) :** (१) “दि ललित” या पंचतारांकित हॉटेलमध्ये कोविड लस दिली जात असल्याचे निदर्शनास आले नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२), (३) व (४) मा. महापौर यांनी दिनांक ३०.०५.२०२१ रोजी केलेल्या पाहणीच्या दिवशी सदर पंचतारांकित हॉटेलमध्ये कोणतेही लसीकरण सुरु नसल्याने घरगुती वापराच्या फ्रिजमधे कोविड लसीचा साठा करणे व कोल्ड चेन मेंटेन करणे याबाबत प्रश्न उद्भवत नाही.

तसेच, “दि ललित” या पंचतारांकित हॉटेलमध्ये क्रिटीकेअर रुग्णालयाच्या माध्यमातून आय. सी.आय. सी. आय. बँकेच्या कर्मचाऱ्यांकरिता केंद्र सरकारच्या निर्देशानुसार दिनांक २२.०५.२०२१ रोजी वर्कप्लेस व्हॅक्सिनेशन आयोजित करण्यात आले होते. तसेच, सदर हॉटेल व रुग्णालयाची चौकशी करण्यात आली आहे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भिवंडी, (जि.ठाणे) येथील गोवे आणि कटई नाक्यांवरील पथकर वसुली बंद करण्याबाबत**

**(२४) ३००८३ (१२-०६-२०२१). श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.राजकुमार पटेल (मेळघाट) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील भिवंडी-कल्याण तालुक्यांना जोडणारा राज्यमार्ग क्रमांक ४० वरील गोवे आणि कटई पथकर नाक्यांना पथकर वसुलीस परवानगी दिलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पथकर वसुलीस शेवटची मुदतवाढ महाराष्ट्र मोटार वाहन कर अधिनियम अंतर्गत क्र. खाक्षेस.२००४/प्र.क्र.३२५/रस्ते-८ ह्या अधिसूचनेद्वारे कंत्राटदारास दिनांक १० ऑक्टोबर २०१८ ते ९ एप्रिल २०१९ रोजी पर्यंत दिली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर पथकर वसुली दिनांक १० एप्रिल २०१९ ते अद्यापपर्यंत सुरुच आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, पथकर वसुलीची मुदत संपल्यानंतरही पथकर वसूल करणाऱ्यांवर कारवाई करुन पथकर वसुली बंद करण्याबाबत कोणीत कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-१२-२०२१) : (**१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
शासनाने पथकर वसुलीस दिनांक १०.०३.२०२१ पर्यंत मुदत वाढ दिली होती.
(३) हे खरे नाही.
दि. १०.०३.२०२१ रोजी रात्री १२.०० वाजता पथकर वसुली बंद करण्यात आली आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्ह्यातील पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीमध्ये झालेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(२५) ३२५८७ (२५-११-२०२१). श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर), श्री.सुनिल भुसारा (विक्रमगड), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.राजेश नरसिंगराव पाटील (चंदगड), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्ह्यातील पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीच्या कामकाजासंदर्भात गैरव्यवहाराच्या अनेक तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या असल्याचे दिनांक १७ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी भक्ती निवासासाठी खाजगी जागा खरेदी करण्याचा प्रस्ताव, समितीच्या कार्यालयाचे नुतनीकरण, शासनाची परवानगी न घेता करण्यात आलेली नोकरभरती, पुजाऱ्यांची केलेली नियुक्ती, टेंबलाई मंदिर परिसरात शेड उभारणे तसेच खाजगी सुरक्षा रक्षकांची नियुक्ती, पॅथॉलॉजी लॅबसाठी जागा या बाबी जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्या समवेत झालेल्या दिनांक १६ सप्टेंबर, २०२१ च्या बैठकीत निदर्शनास आल्या असून, शासनाकडे प्राप्त झालेल्या तक्रारीमध्ये यांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषीविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उद्धव ठाकरे (०२-१२-२०२१) :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.

कोल्हापूर जिल्हयातील देवस्थान व्यवस्थापन समिती पश्चिम महाराष्ट्र कोल्हापूर, या समितीच्या कारभाराबाबत तक्रारी शासनास प्राप्त झालेल्या आहेत. तथापि, दिनांक १७/०९/२०२१ रोजीची तक्रार अप्राप्त आहे.

(२) होय, हे खरे आहे.

श्री. प्रमोद दत्ताजी सावंत व इतर यांचा दिनांक १३/०९/२०२१ रोजीचा तक्रार अर्ज जिल्हाधिकारी कोल्हापूर यांच्याकडे प्राप्त झालेला आहे. सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कोल्हापूर यांच्याकडे दिनांक १६/०९/२०२१ रोजी सुनावणी झालेली आहे. तक्रारदाराने केलेल्या सदर तक्रारीतील काही मुद्दे यापूर्वी शासनास प्राप्त झालेल्या तक्रारीत आहेत.

(३) शासनाकडे प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने देवस्थान व्यवस्थापन समिती पश्चिम महाराष्ट्र कोल्हापूर यांच्याकडून अहवाल मागविण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवी मुंबई येथील खारघर परिसरातील सेक्टर ४० येथील बागेश्री गृहप्रकल्प अपूर्ण अवस्थेत असल्याबाबत

**(२६) ३२६५२ (२३-११-२०२१). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई सिडको प्रशासनाचा नियोजन शुन्य कारभारामुळे सर्वांसाठी घरे या तत्वानुसार प्रधानमंत्री आवास योजनेनुसार खारघर परिसरातील सेक्टर ४० येथील बागेश्री गृहप्रकल्प अपूर्ण अवस्थेत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बागेश्री गृहप्रकल्पात एकूण २३ इमारती असून १५ एलआयजी व ८ ईडब्ल्युएस चा समावेश असून एकूण २००० घरांचे गृहसंकुल उभारण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सिडको प्रशासनाने २०१८ साली सोडत काढलेल्या बागेश्री गृहप्रकल्पाची माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये घरांचा ताबा देण्याचे निश्चित केले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, २०२१ चा कालावधी उलटत आला तरी देखील सिडको प्रशासनाने या प्रकल्पाची कामे पूर्ण केली नसल्यामुळे सर्व लाभार्थ्यांना अद्याप घरे मिळाली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून बागेश्री गृहप्रकल्पातील घरे सर्व लाभार्थ्यांना तातडीने देण्याबाबत तसेच सदर प्रकल्पाकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधीत अधिकाऱ्यांवर कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात आली आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-१२-२०२१)** : (१), (२), (३), (४) " सर्वांसाठी घरे " या धोरणांतर्गत सिडको महामंडळाने वित्तीय वर्ष २०१८-१९ मध्ये एकुण १४८३८ सदनिकांची सोडत काढली आहे.सदर सदनिका पंतप्रधान आवास योजनेंतर्गत परवडणा-या घरांची योजना व सी.एल.एस.एस. योजनेंतर्गत समाविष्ट आहेत.

त्यानुसार सन-२०१८ मध्ये सोडत काढलेल्या बागेश्री गृहप्रकल्पातील सदनिकांचा ताबा ऑक्टोंबर २०२० मध्ये देण्याचे प्रस्तावित होते परंतु कोरोना महामारीमुळे सदर प्रकल्प पुर्ण होण्यास विलंब झाला आहे. बागेश्री गृहप्रकल्पातील सर्व इमारती व पायाभुत सुविधांची कामे पुर्ण झालेली आहेत. तसेच पावसाळ्यामुळे विलंब झालेली, संरक्षण भिंत व तत्सम कामे सुरु असुन प्रगतीपथावर आहेत.

बागेश्री गृहप्रकल्पातील २०२० सदनिकांपैकी १०५६ सदनिकाधारकांनी संपुर्ण रक्कम अदा केली असुन लाभार्थ्यांना घराचा ताबा देण्यास दि.१ जुलै,२०२१ पासुन सुरवात करण्यात आली असुन ९७७ लाभार्थ्यांना सदनिकांचा ताबा देण्यात आला आहे.

(५) कोरोना महामारीच्या पार्श्वभुमीवर तसेच दरम्यानच्या कालावधीतील पावसाळा यामुळे सदर प्रकल्प व तत्सम कामे पुर्ण होण्यास विलंब झालेला आहे.

---

**पनवेल महानगरपालिकेला थकीत वस्तूसेवाकर (GST) अनुदान तातडीने मिळण्याबाबत**

**(२७) ३२६५३ (१७-११-२०२१). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड) महानगरपालिका स्थापन होवून जवळपास चार वर्षाचा कालावधी होवूनसुध्दा जवळपास ६६५ कोटी ४७ लाख रुपये थकीत वस्तू सेवाकराचे (GST) अनुदान अद्याप न मिळाल्यामुळे पनवेल महानगरपालिका हद्दीत पायाभूत सुविधा पुरविण्यास अनेक अडचणी निर्माण होत असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पनवेल महानगरपालिकेचे उत्पन्नाचे आर्थिक स्त्रोत पाहता महानगरपालिकेला पायाभूत सुविधा व प्रशासकीय खर्च पुरविण्यास अडचण निर्माण होत असून वस्तू सेवाकर (GST) अनुदान मिळण्यासाठी महानगरपालिकेकडून वारंवार मागणी करूनसुध्दा संबंधित विभागाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार महानगरपालिका हद्दीत पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी पनवेल महानगरपालिकेला थकीत वस्तू सेवाकर (GST) अनुदान तातडीने मिळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-१२-२०२१) :** (१), (२) व (३) महाराष्ट्र वस्तु व सेवा कर (स्थानिक प्राधिकरणांना भरपाई देण्याबाबत) अधिनियम-२०१७, अन्वये वित्त विभागाच्या मंजूरीने पनवेल महानगरपालिकेस माहे जुलै, २०१७ ते डिसेंबर, २०२१ या कालावधीत वस्तु व सेवा कर भरपाई अनुदान रु.१८८.६७ कोटी अनुज्ञेय होते. त्यानुसार आतापर्यंत रु.१८८.६७ कोटी इतके अनुदान प्रत्यक्षात वितरीत करण्यात आले आहे. सबब, पनवेल महानगरपालिकेस कोणतीही थकबाकी देय नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवी मुंबई सिडको हद्दीतील खारघर, कामोठे, कळंबोली, खांदा कॉलनी व नवीन पनवेल येथील रस्त्यांची झालेली दुरावस्था**

**(२८) ३२६५४ (२३-११-२०२१). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबई सिडको हद्दीतील खारघर, कामोठे, कळंबोली, खांदा कॉलनी व नवीन पनवेल येथे ठिकठिकाणी रस्ते खोदून टाकण्यात आलेल्या महानगर गॅस लि.च्या पाईपलाईनमुळे रस्त्यांची मोठया प्रमाणात दुरवस्था झाली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रस्ते खोदून महानगर गॅसने पाईपलाईन टाकून जवळपास दोन महिन्यांचा कालावधी होवुनसुद्धा रस्ते पूर्ववत न केल्यामुळे नागरिकांना चालण्यास व वाहन चालकांना वाहन चालवण्यास अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून महानगर गॅसची पाईपलाईन टाकतांना खराब झालेले रस्ते तातडीने दुरूस्त करण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपायायोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-१२-२०२१) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) मे.महानगर गॅस लिमिटेड यांनी सिडकोच्या परिवहन विभागाच्या परवानगीनंतर खारघर, कामोठे, कळंबोली, खांदा कॉलनी व नवीन पनवेल येथील रहिवास्यांना पुरवठा करण्यासाठी पाईपलाईन टाकलेली आहे. सदर पाईपलाईन टाकतांना खराब झालेले रस्ते दुरुस्ती खर्च मे. महानगर गॅस लिमिटेड यांचेकडून घेण्यात येतो. तद्नंतर एकत्रितरित्या दुरुस्तीचे काम सिडकोकडुन करण्यात येते.

काही प्रभागांमध्ये रस्त्याच्या दुरुस्तीचे काम सुरु झाले असुन शिल्लक रस्त्याच्या डांबरीकरणाच्या कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन सिडकोकडून दुरुस्तीचे काम सुरु करण्यात येत आहे.
(४) दरम्यानच्या काळात पावसाळा असल्याने खराब रस्त्याचे डांबरीकरण करणे शक्य झाले नाही.

---

**मुंबईतील उर्वरित दिड लाख गिरणी कामगरांना घरे उपलब्ध करुन वितरीत करणेबाबत**

**(२९) ३२७२१ (२२-११-२०२१). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), डॉ.डॉ.विनय विलासराव कोरे (सावकर) (शाहूवाडी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत गिरणी कामगारांच्या घरासाठी सुमारे पाउणे दोन लाख अर्ज म्हाडाकडे दाखल झाले असून आतापर्यंत १५ हजार कामगारांना घरे देण्यात येऊन यापुढे जास्तीत जास्त १० हजार घरे शक्य असल्याने उर्वरित दीड लाख गिरणी कामगारांना घरे घेण्यासाठी शासनाने ठोस धोरण जाहीर करण्याची मागणी करत, मागणी मान्य न झाल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा कामगार संघटनांनी राज्य शासनास दि.३ सप्टेंबर, २०२१ रोजी दिला हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गिरणी कामगारांची एकूण पाऊणे दोन लाख संख्या व आता पर्यंत गेली २० वर्षात वितरीत करण्यात आलेली घरांचे प्रमाण विचारात घेता कमतरता पडत असलेली दीड लाख घरे गिरणी कामगारांना उपलब्ध करुन देणेबाबत ठोस धोरण मंजूर असूनही त्यापैंकी २८ जून,२०१२ रोजी ६९२५, ९ मे,२०१६ रोजी २६३४, २ डिसेंबर,२०१६ रोजी २४१७ आणि १ मार्च,२०२० रोजी ३८९४ अशाप्रकारे अद्यापपर्यंत केवळ १५८७१ घरांचे गिरणी कामगारांना वाटप झालेले असणे, उर्वरित नोंदणी केलेले गिरणी कामगार गेल्या अनेक वर्षांपासून घरांच्या व पुनर्वसनाच्या प्रतिक्षेत आहेत हे ही खरे आहे का,

(३) असल्यास,यापैकी बरेच गिरणी कामगार अतिवरिष्ठ नागरीक असून घरांच्या प्रतिक्षेत काहींचा दुर्दैवी मृत्यू झालेला असणे, गिरणी कामगारांना/वारसांना घरे मिळण्याकरीता अध्यक्ष, सर्व श्रमिक संघटना तसेच अध्यक्ष, गिरणी कामगार विभाग, सर्व श्रमिक संघटना यांनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक ७ जानेवारी, २०२०, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२० तसेच दिनांक १६ फेब्रुवारी, २०२१ रोजी निवेदनाद्वारे मागणी केलेली असणे, गिरणी कामगारांनी घरे मिळण्याबाबत शासनाकडे वारंवार मागणी करुनही त्याकडे शासनाचे दुर्लक्ष होत होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीची सद्यस्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (१५-१२-२०२१) :** (१) ते (५) बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली १९९१ मधील सुधारीत विनियम ५८ (१) (ब) नुसार मुंबईतील बंद/आजारी ५८कापड गिरण्यांची मोकळी जागा व शिल्लक चटई क्षेत्र यांचे वाटप साधरणत: १/३ हिस्सा बृहन्मुंबई महानगरपालिका, म्हाडा व गिरणी मालक यांना प्रत्येकी देण्याची तरतूद केली आहे. त्यानुसार म्हाडास उपलब्ध होणा-या जमिनीवर गिरणी कामगारांसाठी २/३ गाळे व संक्रमण सदनिकांसाठी १/३ गाळे बांधण्याची तरतूद आहे.

उक्त ५८ गिरण्यांपैकी म्हाडाचा वाटा निश्चित झालेल्या ३७ गिरण्यांच्या १६.०४ हेक्टर जमिनींवर गिरणी कामगारांसाठी १६२६४ सदनिका व ७७०२ संक्रमण सदनिका अशा एकूण २२९३६ सदनिका बांधणे शक्य आहे. तथापि, सद्य:स्थितीमध्ये म्हाडाकडे ३३ गिरण्यांच्या १३.७८ हेक्टर जमिनीचा प्रत्यक्ष ताबा प्राप्त झालेला आहे. उर्वरीत चार गिरण्यांच्या जमिनीचा वाटा म्हाडास हस्तांतरीत झालेला नाही.

म्हाडाने गिरणी कामगारांच्या माहिती संकलना संदर्भात राबविलेल्या तीन मोहिमेमध्ये सुमारे १ लाख ७४ हजार गिरणी कामगार / त्यांच्या वारसांनी गिरणी कामगारांच्या घरांसाठी अर्ज केले आहेत.

म्हाडास ताबा प्राप्त झालेल्या गिरण्यांच्या जमिनीवर गिरणी कामगारांसाठी बांधण्यात आलेल्या सदनिकांची चार वेळा लॉटरी पध्दतीने १५८७० सदनिकांची सोडत काढण्यात आलेली आहे.

गिरणी कामगार व त्यांच्या वारसांनी केलेल्या अर्जाची संख्या विचारात घेता, या गिरणी कामगारांना / वारसांना म्हाडामार्फत घरे उपलब्ध करुन देण्यासाठी, ठाणे जिल्हायातील ७ गावांतील जवळपास ११० एकर शासकीय जमिनी म्हाडास उपलब्ध करुन देण्यासंदर्भात शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

---

**सिडको हद्दीतील नविन पनवेल सेक्टर १ एस येथील भिमनगर येथील झोपडपट्ट्या नोटीस न देता पाडण्यासाठी गेल्याबाबत**

**(३०) ३२७४२ (२५-११-२०२१). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिडको हद्दीतील नविन पनवेल सेक्टर १ एस येथील १५ वर्षापेक्षा जास्त कालावधीतील असलेल्या भिमनगर येथील १०८ झोपडपट्ट्या कोणत्याही प्रकारची नोटीस न देता पोलीस फौज फाटयासह पाडण्यासाठी सिडको प्रशासन गेले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर झोपडपट्टीमधील रहिवासी मोलमजूरी करून आपल्या कुटूंबियांचा उदर निर्वाह करण्याकरिता गेल्या १५ वर्षापासून तेथे वास्तव्य करित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केंद्र व राज्य शासनाने बेघर असलेल्यांना स्वत:च्या मालकीचे घर २०२२ पर्यंत देणे योजिले असताना सिडको हद्दीतील भिमनगर झोपडपट्टीबाबत सिडको प्रशासनामार्फत कोणतीच योजना आखली नसून सिडको प्रशासन झोपडया पाडण्यासाठी गेल्याने झोपडपट्टीवासियांवर अन्याय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सिडको हद्दीतील भिमनगर झोपडपट्टी वासियांचे पुनर्वसन करण्याबाबत कोणती उपाययोजना केली तसेच कोणत्याही प्रकारची नोटीस न देता झोपडपट्टी पाडण्यास आलेल्या संबधित अधिकाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-१२-२०२१) :** (१) हे खरे आहे.

नवीन पनवेल सेक्टर १ एस येथील सिडकोच्या मालकीच्या भुखंड क्र.१४० सी, क्षेत्र ८४०० चौ.मी. वर झोपडी धारकांनी तात्पुरत्या कच्च्या स्वरुपाचे पत्रे व प्लास्टिक आच्छादित स्वरुपाचे अतिक्रमण केलेले आहे. सदरचा भुखंड विक्री करण्याची प्रक्रिया सुरु असुन दि.२२.१०.२०२१ रोजी अतिक्रमण निष्कासन मोहीम करण्यात आली होती.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

नवी मुंबई जमीन विल्हेवाट अधिनियमांतर्गत सिडकोच्या जमिनीवर घरे तयार करुन लॉटरी पद्धतीने वाटप करण्यात येतात. त्याचप्रमाणे प्रधानमंत्री आवास योजनेची घरे देखील लॉटरी पद्धतीनेच वाटप करण्यात येतात.

(४) दि.२२.१०.२०२१ रोजीच्या अतिक्रमण निष्कासन मोहीमेस झोपडपट्टीवासियांचा तीव्र विरोध झाल्याने निष्कासनाची कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदपूर (जि. लातूर) तालुक्यातील सर्व्हे क्र. ४ वरील गायरान जमिनीवरील अतिक्रमणाबाबत**

**(३१) ३३०३० (१२-११-२०२१). श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदपूर (जि. लातूर) तालुक्यातील सर्व्हे क्र. ४ वरील गायरान जमिनीवरील अतिक्रमण कायम करुन तातडीने कबाले देवुन प्रधानमंत्री आवास योजनेचे फॉर्म भरुन घेण्याबाबतच्या मागणीसाठी उपविभागीय कार्यालयासमोर दिनांक १० ऑक्टोंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शने करण्यांत आलेली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सर्व्हे क्र. ४ वरील शासकीय जागेवर ५० वर्षापासून अतिक्रमण असून २६७ अतिक्रमणापैकी २४० लाभार्थ्यांचे अतिक्रमण नियमानूकूल करण्याची प्रक्रिया सुरु करुन अतिक्रमीत केलेल्या क्षेत्राचे पैसे भरुन घेऊन कबालनामे वितरीत करण्याची मागणी धरणे आंदोलनात करण्यांत आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागण्यांच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-१२-२०२१) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) सदर प्रकरणी नगररचनाकार, लातूर यांनी दि.११.०९.२०१९ रोजी जिल्हाधिकारी, लातूर यांना पाठविलेल्या रेखांकनातील तरतूदींना शिथिलता देण्याच्या प्रस्तावास संचालक, नगररचना, पुणे यांनी दि.१०.०२.२०२१ रोजी मान्यता दिली आहे. तसेच उपविभागीय अधिकारी, अहमदपूर यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या दि. २४ नोव्हेंबर, २०२१ रोजी झालेल्या बैठकीत २४२ अतिक्रमणे नियमानुकूल करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

---

**मुंबईतील मालाड-मालवणी परिसरतील शासकिय जमिनीवरील अनधिकृत झोपडपटटीतील तीन मजली इमारत कोसळून १२ व्यक्तींचा झालेला मृत्यु**

**(३२) ३३१५१ (२३-११-२०२१). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मालाड-मालवणी परिसरातील शासकीय जमिनीवरील अनधिकृत झोपडपटटीतील तीन मजली इमारत कोसळून १२ व्यक्ती ठार व अनेक व्यक्ती जखमी झाल्याचे दिनांक १० जुन, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे,
(३) असल्यास, चौकशी काय आढळून आले व त्यानुषंगाने मृत व्यक्तीच्या वारसांना व जखमींना मदत करण्याबाबत तसेच उक्त शासकिय जमिनीवरील अनधिकृत बांधकामे काढून टाकण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (०५-०१-२०२२) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) न्यू कलेक्टर कंपाऊंड, मालवणी गेट नं.८, प्लॉट नं.७२, अब्दुल हमीद मार्ग, मालाड (प), मुंबई येथे दि.०९.०६.२०२१ रोजी तळमजला + ३ मजला असलेले बांधकाम हे समोरील तळमजला + १ मजला असलेल्या बांधकामावर कोसळले.

सदर दुर्घटनेत १२ व्यक्तींचा मृत्यु झाला व ०८ जण जखमी झाले होते. सदर दुर्घटनेतील १२ मयत व्यक्तीपैकी एका मयत व्यक्तीच्या वारसाची चौकशी न झाल्याने उर्वरित ११ मयत व्यक्तींना राज्य आपत्ती प्रतिसाद निधी (SDRF) मधून एकूण रूपये ४४,००,०००/- व ६ जखमी व्यक्तींना रुपये ३४, २००/- इतक्या रकमेची मदत देण्यात आली असल्याचे तहसलिदार, बोरीवली यांनी दि.२०.१२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. तसेच दि. ०१.०१.२००४ ते दि.३१.१२.२०२० या कालावधीत उपजिल्हाधिकारी (अति/निष्का), मालाड-२ यांच्याकडून मौजे-मालवणी येथील २९४ अतिक्रमणे निष्कासित करण्यात आली व २३३२० झोपडया निष्कासित करण्यात आल्या आहेत. सदर दुर्घटनेच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालय मुंबई येथे जनहित याचिका क्रमांक १/२०२० दाखल असून सदर जनहित याचिका प्रलंबित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**डहाणू नगरपरिषद हद्दीतील मुख्य राज्य मार्गावर पावसाचे पाणी रस्त्या वर येऊन रस्ते खराब झाल्याबाबत**

**(३३) ३३२८० (२२-११-२०२१). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू नगरपरिषद हद्दीतील डहाणू रोड, मल्यााण, पारनाका, ईराणी रोड, थर्मल पावर रोड, सागरनाका, रामवाडी, सरावली, आगर, डहाणू बोर्डी रोड या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अखत्यारित असणा-या मुख्य राज्य मार्गावर पावसाचे पाणी रस्त्यावर येऊन मोठ-मोठे खड्डे पडले असून वाहनांचे अपघात मोठया प्रमाणात होत असल्याचे समजते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्यापपर्यंत खड्डे न बुजविण्याचे कारण काय,
(३) असल्यास, सदर खड्डे बुजविण्याकडे सा.बां. खात्याचे दुर्लक्ष होत असून खड्डे तात्काळ बुजविण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे ,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय?

**श्री. अशोकराव चव्हाण (१४-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही. सा.बां.विभागाच्या अखत्यारीतील मल्याण, पारनाका, सागरनाका, रामवाडी, सरावली, आगर, डहाणू बोर्डी रोड रस्त्यावरील पावसाळ्यात पडलेले खड्डे डांबराने भरण्यात आलेले आहेत. सद्यस्थितीचे सदर रस्ते वाहतुकीकरिता सुस्थितीत आहेत.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## (ता. खेड, जि.रत्नागिरी ) तळे देवघर बंदरवाडी व कुंभाड बोरीची पट्टी या दोन नदीवर पुल बांधण्याबाबत

**(३४) ३३३१० (२३-११-२०२१). श्री.योगेशदादा कदम (दापोली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खेड तालुक्यातील ( जि.रत्नागिरी ) तळे देवघर बंदरवाडी व कुंभाड बोरीची पटटी या दोन नदीवर गेल्या अनेक वर्षापासून ग्रामस्थांकडून पुलांची मागणी होत आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त नदीवर पूल नसल्याने दरवर्षी पावसाळयात जवळजवळ चार महिने दळणवळण बंद होते हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू तळे देवघर बंदरवाडी व कुंभाड बोरीची पटटी या दोन नदीवर तातडीने पुल होण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधिंनी सातत्याने संबंधित विभागाकडे पाठपुरावा करूनही कार्यवाही झालेली नाही हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने पाहणी केली आहे काय,त्यात काय आढळून आले,
(५) तदनुसार उक्त दोन नदीवर पुल बांधण्याकरिता किती निधीची तरतूद करण्यात आली आहे वा येत आहे, नसल्यास ,विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अशोकराव चव्हाण (०७-१२-२०२१) :**(१) होय,हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

तळे बंदर वाडी ग्रामिण मार्ग २१८ या रस्त्यावर सा.क्र. ०/८०० येथे निम्नजल कॉजवे आहे.तेथे काही कालावधीसाठी वाहतुक खंडीत होऊन नंतर पूर्ववत होते.खंडीत झालेल्या कालावधीत पर्यायी मार्गाने वाहतूक करावी लागते.

प्रजिमा ८४ वरील कुंभाड बोरीची पट्टी येथे पावसाळ्यादरम्यान पर्यायी मार्गाने वाहतुक करावी लागते.

(३) (४) व (५) हे खरे नाही.

प्रश्नांकित तळे बंदरवाडी मार्गावर उंच पुल बांधणेकरिता रु.३९९.०० लाख किंमतीच्या प्रस्तावास नाबार्डने मान्यता दिली आहे.

तसेच कुंभाड बोरीची पट्टीजवळील पुलाचे काम हे निकष, मंजूरी व निधी उपलब्धततेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन राहील.

---

**शहापूर वन विभागाने सन २०१९-२० मध्ये एकूण ६ वन परीक्षेत्रातील जल मृदू संधारणा अंतर्गत सिमेंट कॉक्रीट बंधारे,इत्यादी कामांमध्ये अनियमितता झाल्याबाबत**

**(३५) ३३५२९ (२३-११-२०२१). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील ठाणे वन विभागा अंतर्गत शहापूर वन विभागाने सन २०१९-२० मध्ये एकूण ६ वन परीक्षेत्रातील जल मृदू संधारणा अंतर्गत सिमेंट कॉक्रीट बंधारे, वन तलाव, सलग समतर चर, दगडी नाला बांध ,ग्याबियान स्ट्रक्चर बंधारे ,इत्यादी कामांमध्ये अनियमितता झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय?

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय?

(३) असल्यास, चौकशीअंती काय निदर्शनास आले,तदनुसार एकूण ४०८ कामांमध्ये अनियमितता व बोगस देयके अदा करणाऱ्या वन अधिकाऱ्यांवर कोणती कडक कारवाई केली वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास,विलंबाची कारणे कोणती ?

**श्री. उद्धव ठाकरे (२१-१२-२०२१) : (**१) हे खरे नाही.

ठाणे वन वृत्तातील शहापूर वन विभागातंर्गत सन २०१९-२० मध्ये मृद संधारणा अंतर्गत सिमेंट कॉक्रीट बंधारे, वन तलाव, सलग समतर चर, दगडी नाला बांध, गॅबियन स्ट्रक्चर बंधारे, चेकडॅम कामे अंदाजपत्रकीय मोजमापाप्रमाणे करण्यात आलेली असून सदर कामांची तपासणी वनपरिक्षेत्र अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक यांचेमार्फत करण्यात आलेली आहे. सदर कामांमध्ये गैरव्यवहार केला असल्याचे निदर्शनास आलेले नाही तसेच संबंधित प्रकरणाबाबत कुठलीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

(२), (३), (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्ह्यातील कंत्राटदार व अधिकारी यांच्या संगनमताने शासनाचा कोट्यावधी रूपयांचा डांबरामध्ये केलेला गैरव्यवहाराबाबत**

**(३६) ३३६४७ (२५-११-२०२१). श्री.राजेश पवार (नायगांव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्यामध्ये नांदेड जिल्ह्यामध्ये रस्त्यांची कामे ही अत्यंत निकृष्ठ दर्जाची झाली असून यामध्ये शासनाच्या पैशाची खुप मोठ्या प्रमाणात लुट होत असल्यामूळे सर्वसामान्य नागरिकांच्या वाहतूक व्यवस्थेला मोठ्या प्रमाणात खिळ बसल्याचे निर्दशनास आले आहे, हे खर आहे काय,

(२) असल्यास , नांदेड जिल्हयातील काही कंत्राटदार व सार्वजनिक विभागाचे काही अधिकारी यांच्या संगनमताने शासनाचा कोट्यावधी रूपयांचा डांबरामध्ये केलेला गैरव्यवहार निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय ,
(३) असल्यास, संबंधित कंत्राटदार व दोषी अधिकाऱ्यावर गुन्हा दाखल झाला आहे, हे ही खर आहे काय ,
(४) असल्यास, संबंधित कंत्राटदार व दोषी अधिकाऱ्यावर गुन्हा दाखल करून कोणती ठोस कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अशोकराव चव्हाण (१७-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) कंत्राटदारांनी सादर केलेल्या डांबराची बिजके शासकीय परिष्करणाच्या (Govt. Refinery) अभिलेख्याशी जुळत नसल्याचे सत्यपनात निदर्शनास आल्याने कंत्राटदारांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सद्य:स्थितीत अधिकाऱ्यांविरुध्द कार्यवाही प्रस्तावित नाही. कंत्राटदारांविरुध्द दाखल गुन्हयासंबंधात प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अमरावती जिल्हयातील मेळघाटासह इतर मार्गावर सागवानाची तस्करी व तानसा अभयारण्यातील ( जि.ठाणे) वन्यजीव वनपरिक्षेत्रात सागवान जातीच्या वृक्षांची कटरच्या सहायाने कत्तल झाल्याबाबत**

**(३७) ३४०७० (११-११-२०२१). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तानसा अभयारण्यातील ( जि.ठाणे) वन्यजीव वनपरिक्षेत्र वैतरणा हद्दीत वाडा व शहापूर तालुक्याच्या हद्दीवरील निशेत गावाजवळ कपारमेंड नंबर ९३७ मध्ये चोरटयांची अंधाराचा फायदा घेत खर्डी-वाडा रस्त्यालगत असलेली सागवान जातीच्या ७० वृक्षांची कटरच्या सहायाने कत्तल केल्याची घटना माहे ऑक्टोबर, २०२१ रोजीच्या सुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) तसेच अमरावती जिल्हयातील मेळघाटासह इतर मार्गावर वनविभागाचे नाके असतानाही प्रशासनाच्या संगनमताने सागवान तस्करी होत असल्याचे दि. २९ ऑगस्ट,२०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन येथील सागवान तस्करी रोखण्याबाबत तसेच सागवानाची तस्करी करणा-यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे,
(४) चौकशीनुसार आतापर्यंत किती जणांना अटक करण्यात आली आहे व त्यानुषंगाने असल्यास कोणत्या कलमान्वये कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उद्धव ठाकरे (१४-१२-२०२१) :** (१) माहे जुन, २०२१ व जुलै, २०२१ दरम्यान तानसा वन्यजीव अभयारण्यातील निशेत नियतक्षेत्रात खर्डी वाडा रस्त्यालगत दोन घटनांमध्ये ४ सागवान व २ खैर प्रजातीच्या वृक्षांची तोड झाल्याचे निदर्शनास आले आहे. प्रस्तुत प्रकरणी वनगुन्हा नोंदविण्यात आला असून एकुण रु. ४२,२९७/- किंमतीचा वनोपज जप्त करण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) क्षेत्रीय स्तरावर वनांचे संरक्षणाकरीता खालील प्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

- वनक्षेत्रातील संवेदनशिल क्षेत्रात संरक्षण कॅम्प तयार करण्यात आले आहेत.
- क्षेत्रीय कर्मचारी संरक्षण कॅम्पवर मुक्कामी राहून दिवस-रात्र संरक्षण / गस्त करतात.
- तपासणी नाक्यावरुन येणाऱ्या-जाणाऱ्या वाहनांची तपासणी केली जाते.
- सुर्यास्त ते सुर्योदयापर्यंत वाहनांना दर दोन तासाचा थांबा देऊन वाहने सोडण्यात येतात व रात्रीच्या वाहन वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्यात येते.
- प्रत्येक सागवान व इतर वृक्षांच्या अवैध वृक्षतोड वाहतुक प्रकरणी भारतीय वन अधिनियम, १९२७ तसेच वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ अन्वये वनगुन्हे नोंदविण्यात येऊन सक्षम अधिकाऱ्यांमार्फत चौकशी करण्यात येते व आरोपींवर नियमानुसार कार्यवाही करण्यात येते.
- अवैध वृक्षतोडीवर नियंत्रण व मुल्यमापनासाठी नियतक्षेत्र तपासणी कार्यक्रम राबविण्यात येतो.
- वन व वन्यजीव संरक्षणाबाबत जनसामान्यांत जनजागृती करण्यात येते.
- मेळघाट व्याघ्र प्रकल्प क्षेत्रात STPF पथकाद्वारे नियमित गस्त करण्यात येते तसेच पावसाळ्यात विशेष गस्त करण्यात येते.
- मेळघाट व्याघ्र प्रकल्पात सायबर सेल तयार करण्यात आला असून राज्यात कुठल्याही वनगुन्हा प्रकरणी चौकशीसाठी Data CDR/SDR चौकशी अधिकाऱ्यांना त्यांच्या मागणीनुसार संबंधित विभागातार्फत उपलब्ध करुन देण्यात येतात.

(४) तानसा अभयारण्यातील निशेत नियतक्षेत्रातील अवैध वृक्षतोडीच्या दोन प्रकरणात वनगुन्हा नोंदविण्यात आला असून आरोपी अंधाराचा फायदा घेवून पळुन गेल्याने व शोधमोहिमे दरम्यान आरोपी न मिळाल्याने कोणासही अटक करण्यात आलेली नाही. तथापि अद्याप दोन्ही प्रकरणामध्ये आरोपींचा शोध घेणे सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती जिल्हयातील ग्रामीण भागात वन्यप्राणी पिकांवर हल्ला करीत असल्याबाबत

**(३८) ३४०८२ (२३-११-२०२१). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील अचलपूर, चांदूरबाजार, दर्यापूर, अंजनगांव तालुक्यातील ग्रामीण भागात रोही, रानडुक्कर, हरणाचे कळप रात्री पिक फस्त करीत असल्याचे दि. २२ जुलै,२०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, यामुळे येथील शेतकरी हवालदिल झाले असून यासंदर्भात शासनाने उपाययोजना करावी अशी वारंवार मागणी करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेवून येथील वन्य प्राण्यांवर होणारे नुकसान टाळण्यासाठी व झालेल्या नुकसानीची भरपाई तातडीने देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उद्धव ठाकरे (२१-१२-२०२१) :** (१) अमरावती जिल्हयातील अचलपूर, चांदूरबाजार, दर्यापूर, अंजनगाव तालुक्यात  हरीण, रोही, रानडुक्कर इत्यादी वन्यप्राण्यांचा वावर असल्याचे आढळून आले आहे. तथापि माहे जुलै, २०२१ मध्ये शेतपिकांच्या नुकसानीच्या १४८ घटना निदर्शनास आल्या असून प्रचलित शासन निर्णयातील तरतुदीनुसार संबंधितास एकुण रु. १३,८५,९५५ अदा करण्यात आली आहे.
(२) व (३) वन्यप्राण्यांकडून होणारे शेतपिकांचे नुकसान टाळण्यासाठी क्षेत्रिय स्तरावर खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.
• वन्यप्राणी उन्हाळयामध्ये पिण्याच्या पाण्याच्या शोधात नागरी वस्त्याकडे फिरकू नये यासाठी वन्यप्राण्यांना वनातच पिण्यांचे पाणी उपलब्ध व्हावे यासाठी वनतलाव/ खोदतळे बांधणे, कृत्रिम पाणवठे (सिमेट टाके बांधणे) इत्यादी कामे करण्यात आले आहेत.
• तसेच उपलब्ध बारमाही व हंगामी पाणस्थळावर नियमितपणे गस्त वाढवुन त्यामध्ये सुध्दा पाणी जास्त काळ उपलब्ध राहील याबाबत काळजी घेण्यात येत आहे.
• वन्यप्राण्यांना वनक्षेत्रात चारा उपलब्ध व्हावा म्हणून गवत रोपवन व मिश्र रोपवन घेण्यांत येते. तसेच विविध योजने अंतर्गत कुरण विकासाची कामे करण्यात येतात.
• वन्यप्राण्यांमळे शेतपिकांचे नुकनसान झाल्यास प्रचलित शासन निर्णयातील तरतूदीनुसार नुकसानग्रस्त शेतकऱ्यास तात्काळ अर्थसहाय्य अदा करण्यात येते.
• पिक व फळझाडाचे नुकसान प्रकरणात नुकसान भरपाईच्या तात्काळ अदा करण्याकरिता सदर विषय राज्य सेवा हक्क कायदयामध्ये समाविष्ट करून सेवा Online करण्यात आली आहे.
• वन्यप्राण्यांमुळे होणाऱ्या शेतपिकांच्या नुकसानीपोटी संबंधित नुकसानाग्रस्त शेतकऱ्यास नुकसान भरपाईची रक्कम अदा करण्याकरिता उणे (-) प्राधिकाराची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.
• ज्या क्षेत्रामध्ये वनक्षेत्र कमी आहे किंवा वनक्षेत्र नाही, अशा क्षेत्रात तृणभक्षी प्राण्यांवर उपजीविका करणा-या भक्षक मांसाहारी प्राण्यांची संख्या फारच कमी आहे किंवा जवळपास नाहीत, त्यामुळे तृणभक्षी प्राण्यांच्या संख्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी नैसर्गिक मार्ग नसल्याने त्यांची संख्या बेसुमार वाढून शेत पिक नुकसान मोठया प्रमाणावर होत आहे. या क्षेत्रात पिक नुकसान करणारे निलगाय व रानडुक्कर यांना पारध करण्यासाठी शासन निर्णय दिनांक २२ जुलै २०१५  अन्वये अटींमध्ये सुलभीकरण करण्यात आले असून शेत पिकांच्या नुकसानीस कारणीभूत असलेल्या निलगाय व रानडुक्कर या वन्याप्राण्यांना पारध करण्याचे परवाने जारी करण्याचे अधिकार वनपरिक्षेत्र अधिका-यांना प्रदान करण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

**मुंबईतील बोरीवली (पूर्व) दत्तपाडा झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाच्या मान्यतेसाठी लागणारी ७० टक्केची अट पूर्ण करण्यासाठी नातेवाईकांच्या खोट्या स्वाक्षऱ्या केल्याबाबत**

**(३९) ३४७४२ (२३-११-२०२१). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील बोरिवली पूर्वेतील दत्तपाडा झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पात मान्यतेसाठी लागणारी ७० टक्केची अट पूर्ण करण्यासाठी मुख्य प्रवर्तक आणि विकासकांनी मयत झोपडीधारक आणि त्यांच्या नातेवाईकांच्या खोट्या स्वाक्ष-या केल्याची बाब माहे सप्टेंबर,२०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी पाटीलवाडी रहिवाशी बचाव संघर्ष समितीने एसआरए प्राधिकरणाकडे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार सदरहू प्रकरणी संबंधीत दोषी मुख्य प्रवर्तक आणि विकासकावर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (१५-१२-२०२१) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) सदर तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी अधिकारी यांना प्राधिकृत करण्यात आले होते. त्यांनी दिलेल्या चौकशी अहवालानुसार ४ मयत सभासदांच्या स्वाक्षऱ्या आढळून आलेल्या आहेत. त्यानुषंगाने मुख्य प्रवर्तक/सचिव व खजिनदार यांच्या विरुध्द कस्तुरबा पोलीस ठाणे, बोरीवली (पूर्व) मुंबई येथे फिर्याद दाखल करण्यात आलेली असून त्यानुषंगाने पुढील कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागरी दलितवस्ती सुधार योजनेंच्या कामात गैरव्यहार झाल्याबाबत**

**(४०) ३४९३४ (१६-११-२०२१). श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर महानगरपालिकेला समाजकल्याण विभागाकडून सन २०१९ मध्ये ४० लाख रुपये नागरी दलितवस्ती सुधार योजनेंतर्गत मंजूर करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेचे नगररचनाकार व शासनाची जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत एखाद्या कामाला मंजूरी देण्यापूर्वी नियमानुसार कामाच्या प्रत्यक्ष जागेचे निरिक्षण करणे आवश्यक असतांनाही या प्रकरणात सर्व संबंधित अधिकारी आणि अभियंता यांनी या कामाकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष केले आहे, हे ही खरे आहे.

(३) असल्यास, शासकीय नियमान्वये दलितवस्तीच्या विकासासाठी निधी खर्च न करता इतर ठिकाणी सदर निधी खर्च करण्यात आला असून योजनेच्या कामात गैरव्यहार करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्याअनुषंगााने संबधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२३-१२-२०२१)** : (१) (२) व (३) चंद्रपूर महानगरपालिकेला साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेअंतर्गत सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात महापालिका क्षेत्रातील ५० कामांसाठी रुपये ९,६८,८२,११३/- इतका निधी मंजुर करण्यात आलेला होता.

• सदर कामातील अनुक्रमांक २० येथील कामास रु.३९,२६,४४०/- इतका निधी मंजुर करण्यात आला होता.

• अनुक्रमांक २० येथील काम अनुसुचित जातीसाठी राखीव प्रभागातील नसल्याचे निदर्शनास आल्यानंतर सदर कामावर झालेला प्रत्यक्ष खर्च रु.३८,३९,८५१/- इतकी रक्कम महापालिका निधीतुन साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेच्या खात्यावर वर्ग करण्यात आलेली असुन या निधीतुन अनुसुचित जातीसाठी राखीव प्रभागातील कामे प्रस्तावीत करण्यात आलेले आहेत.

(४) यासंदर्भात संबधीत कनीष्ठ अभियंत्यास आयुक्त,चंद्रपुर महानगरपालिका यांनी कारणे दाखवा नोटीस बजावली असुन संबधीतावर कारवाई सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## तेल्हारा (जि. अकोला) गांधीग्राम रस्त्याची सुधारणा (रा.मा,.२७९ व रा.मा.२७८) बांधकाम HAM (हायब्रीड ॲन्युटी मॉडेल) अंतर्गत करणेबाबत

**(४१) ३५२४८ (२५-११-२०२१). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व)** : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील तेल्हारा गांधीग्राम रस्त्याची सुधारणा (रा.मा,.२७९ व रा.मा.२७८) बांधकाम HAM (हायब्रीड ॲन्युटी मॉडेल) अंतर्गत करण्यात येत असून कामाचा कार्यारंभ आदेश दिनांक १६ मार्च २०१९ ला कंत्राटदारास देण्यात आला असून काम पूर्ण करण्याचा कालावधी दिनांक १५ मार्च, २०२१ पर्यंत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कामाच्या पूर्णत्वाचा कालावधी १५ मार्च, २०२१ असतांना माहे ऑक्टोबर, २०२० अखेर २० कि.मी मधील फक्त रस्ता खोदकाम व रुंदीकारणासाठी जेसीबीव्दारे (JCB) १५ कि.मी. इतकेच काम करण्यात आले असून कामाच्या पूर्ण आवाक्यापैकी सुमारे २५ टक्केच काम करण्यात आले आहे हे ही, खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त रस्त्याचे पूर्ण रुंदीत व खंडित लांबीत खोदकाम करून बांधकाम प्रलंबित असल्याने रस्ता वाहतुकीस अडथळा निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, रस्त्याचे काम कंत्राटदाराकडून नियोजन व गुणवत्ताबद्ध करून घेण्यात सार्वजनिक बांधकाम विभाग अकोला यांचेकडून कंत्राटदारावर कोणती ही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर काम कालमर्यादेत पूर्ण करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे?

**श्री. अशोकराव चव्हाण (०८-१२-२०२१) :** (१) होय. हे खरे आहे.
(२) होय. हे खरे आहे.
(३) अंशतः खरे आहे.

वाहतुकीस अडथळा निर्माण होऊ नये म्हणुन वेळोवेळी खबरदारी घेण्यात आली आहे.
(४) हे खरे नाही. सदर काम नियोजनबद्ध व गुणवत्तापुर्वक करुन घेण्याच्या दृष्टीने कंत्राटदारास वेळोवेळी सुचना देण्यात आल्या आहेत.

परंतु सदर काम वेळेत पुर्ण न केल्यामुळे करारनाम्यातील अट क्र. १२.३.१ नुसार Performance Security (५ % म्हणजेच रु. ५६९८५०००/-) च्या ०.१% प्रतिदिन दराप्रमाणे दंडात्मक नुकसान भरपाई आकारण्यात आली आहे.
(५) सदर काम ३० जून २०२२ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन असून, उद्योजकामार्फत सदर काम प्रगतीत आहे.

---

## सातारा जिल्हयातील महाबळेश्वर येथे जाण्यासाठी पर्यटकांकरिता रोप-वे ची सुविधा निर्माण करणेबाबत

**(४२) ३५३९७ (१५-११-२०२१). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाबळेश्वर या थंड हवेच्या ठिकाणी रस्त्यामार्गे जाणाऱ्या पर्यटकांना पोलादपूर (महाड) ते महाबळेश्वर किंवा वाई (सातारा) ते महाबळेश्वर या रस्त्याचा वापर करावा लागत असल्याने वाहतुक कोंडी होऊन पर्यटकांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पर्यटकांची होणारी गैरसोय टाळणे व त्यांना आकर्षित करण्यासाठी रस्ते मार्ग तयार करणे तसेच पोलादपूर ते महाबळेश्वर व वाई ते महाबळेश्वर या ठिकाणी रोप वे ची सुविधा उपलब्ध करण्याची मागणी सातत्याने होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महाबळेश्वर येथे एकत्रितरित्या धोरण राबवून पर्यटकांना सोईस्कर ठरेल अशा पध्दतीने येथील बाजारपेठा, दुकाने, हॉटेल यांचा विकास करून पर्यटकांना आवश्यक सेवा-सुविधा पुरविण्याची मागणी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर मागण्यांच्या अनुषंगाने येथे रोपवेची सुविधा उपलब्ध करून दिल्यास इंधन बचत, स्थानिकांचा रोजगार, पर्यटकांची घटती संख्या व शासनाचे घटते महसुल इत्यादी समस्यांचे निराकरण होण्यासाठी धोरण निश्चित करून त्याची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्याचा तपशील काय आहे
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (०७-१२-२०२१) :** (१) होय. सुट्टीच्या कालावधीत वाहतूक कोंडी होते हे खरे आहे.
(२) होय. हे खरे आहे.

(३) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने पर्यटनास चालना मिळण्यासाठी व पर्यटकांना सेवा सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी महाबळेश्वर येथील बाजारपेठेतील डॉ. साबणे रोड सुशोभिकरण करण्यासह इतर विकास कामांचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडून पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागास सादर केला असून सदर प्रस्तावाबाबत पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाकडे कार्यवाही सुरु आहे.

(४) व (५) होय, रोपवेची सुविधा उपलब्ध करुन दिल्यास इंधन बचत होईल.

प्रस्तुत प्रकरणी महाबळेश्वर येथे पर्यटकांकरिता रोप-वे उभारणी बाबतचा प्रस्ताव अधिक्षक अभियंता (विद्युत), मुंबई यांच्याकडे प्राप्त झाला असून, प्रस्ताव सादर करणारे प्रवर्तक मेसर्स साईओ इन्फ्रा यांनी रोप वे उभारण्यासाठी लागणा-या विभागापैकी एकूण १७ विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र मिळविलेले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शेगांव पंढरपुर पालखी मार्गाचे काम अत्यंत धिम्या गतीने व निकृष्ट दर्जाचे होत असल्याबाबत.

**(४३) ३५४९५ (२५-११-२०२१). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेगांव पंढरपुर पालखी मार्गाचे काम अत्यंत धिम्या गतीने व निकृष्ट दर्जाचे होत असल्याच्या असंख्य तक्रारी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे स्थानिक लोकप्रतिनिधीकडून करण्यात आल्या आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पालखी महामार्गावरील गोरगांव ते माझोड दरम्यानच्या रस्त्याची संयुक्त पाहणी संबंधीत कार्यकारी अभियंता व स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि. २० ऑगस्ट, २०२१ रोजी करण्यात आली हे खरे आहे काय ,

(३) असल्यास, उक्त पाहणी दरम्यान रस्त्यावर माती मिश्रीत निकृष्ट दर्जाचा मुरूम टाकण्यात आल्याचे तसेच कामाचा दर्जा निकृष्ट असल्याचे प्रत्याक्ष मोक्यावर कार्यकारी अभियंता यांच्या निदर्शनास आणून देण्यात आले हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त रस्त्याच्या निकृष्ट दर्जाचे काम करणा-या कंत्राटदाराची चौकशी करून कारवाई करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मागणी केली, हे खरे आहे काय, असल्यास, शासनाने दोषी कंत्राटदार व अधिकारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, दोषींना पाठीशी घालण्याची कारणे काय तसेच शासनाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. अशोकराव चव्हाण (२१-१२-२०२१) : (**१) हे खरे नाही,

(२) होय, हे खरे आहे.

(३) अंशत: खरे आहे.

अकोला-माझोड-गोरेगांव-वाडेगांव या रस्त्याच्या २० कि.मी.लांबीपैकी ५०० मी.भागातील लांबीत माती मिश्रीत मुरुम टाकल्याचे आढळून आले.

(४) व (५) संबंधीत उद्योजकास याबाबत प्रत्यक्षपाहणीच्या वेळीच तथा दिनांक २४ नोव्हेंबर, २०२१ च्या पत्राव्दारे सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार प्रश्नांकित रस्त्याच्या भागातील निकृष्ट दर्जाचा मुरुम हटविण्यात आलेला आहे. बुलढाणा जिल्हयातील शेगांव पंढरपूर पालखी मार्ग अंतर्गत तीन कामे कार्यान्वीत करण्यात आली आहेत. त्यापैकी २ कामे पुर्ण झाली असून एक काम जवळपास पुर्ण झाले आहे व त्यावरुन वाहतूक सुरळीत चालू आहे व ही कामे निकृष्ट दर्जाची नाहीत.

---

**म्हाडाच्या उपकरप्राप्त इमारत पुनर्विकास योजनेत खाजगी विकासकांकडून कोट्यावधी रुपयांची थकबाकी असल्याबाबत**

**(४४) ३५४९७ (२३-११-२०२१). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हाडाच्या उपकरप्राप्त इमारत पुनर्विकास योजनेत खाजगी विकासकांचा सहभाग आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अश्या खाजगी विकासकांकडून कोट्यावधी रुपयांची थकबाकी येणे आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, पुनर्विकास योजना राबविताना देण्यात येणारी म्हाडाची संक्रमण शिबिरातील घरे योजना पूर्ण झाल्यावर पुन्हा म्हाडाकडे परत करणे बंधनकारक असतानाही विकासकांकडून सदर घरे परत केली जात नाहीत हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी होणाऱ्या दिरंगाईमुळे शासनाचे तसेच गरजू नागरिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे हे ही खरे आहे का,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केजी वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (१३-१२-२०२१) :** (१) मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत विकास नियंत्रण नियमावली ३३ (५), ३३ (७), ३३ (९) व ३३ (१०) अंतर्गत उपकर प्राप्त इमारतीच्या/ झोपडपट्टी पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त विकासक/सहकारी संस्था मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाच्या संक्रमण शिबीरात अटी व शर्तीच्या अधीन राहून संक्रमण गाळे विकासकांना वितरीत करण्यात येतात.

• विकासकांकडील संक्रमण गाळ्यापोटी थकीत भाड्याच्या वसूलीकरीता विकासकाविरूध्द Arbitration कायद्यामधील कलम ९ नुसार पिटिशन दाखल करण्याबाबत संबंधित पॅनल वकिल यांना म्हाडाकडून कळविण्यात आले आहे. तसेच, एकूण २२ थकबाकीदार विकासकांविरूध्द खेरवाडी पोलीस ठाणे येथे म्हाडाकडून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

• सदर प्रकरणी काही विकासकांनी मा.उच्च न्यायालयामध्ये दावे दाखल केले असून सदर दावे मा.उच्च न्यायालयामध्ये प्रलंबित आहेत.

• विकास नियंत्रण नियमावली ३३ (७) अंतर्गत थकबाकी अदा न करणाऱ्या २४ विकासक यांना

काम थांबा नोटीस (Stop work notice) देण्यात आली आहे. तसेच एस.आर.ए. विकास नियंत्रण नियमावली ३३ (१०) अंतर्गत ६ विकासक पुनर्विकास करीत असलेल्या प्रकल्पास काम थांबवा नोटीस देण्यात आली आहे व १० विकासक संक्रमण गाळ्यापोटी थकीतभाडे भरणा करीत नाहीत तोपर्यंत सदर विकासक यांना इतर परवानग्या देण्यात येऊ नयेत व विकासकांची बँक खाती गोठावण्याच्या दृष्टीने त्यांच्या बँक खात्यांचा तपशील मागविण्यात आला आहे. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांना मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाकडून कळविण्यात आले आहे.

• तसेच संक्रमण गाळ्यांच्या भाडयांची थकबाकी असणा-या विकासकाविरूध्द म्हाडा अधिनियम १९७६ चे कलम १८० अंतर्गत कारवाई करण्यात येत आहे. त्याअनुषंगाने विकासक यांची जंगम व स्थावर मालमत्ता याबाबतचा जिल्हाधिकारी/शहर, मुंबई उपनगर, ठाणे, रायगड व पालघर यांच्याकडून तपशील मागविण्यात आला आहे. तथापि, सदर अहवाल म्हाडास अप्राप्त असुन सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कारवाई म्हाडाकडून करण्यात येईल.

• विकासकांना काम थांबवा नोटीस दिल्यानंतर विकासकांकडून माहे एप्रिल २०१६ ते माहे ऑक्टोबर २०२१ अखेर पर्यंत एकूण १४६.५९ कोटी थकीत भाड्याची वसूली करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जव्हार नगरपरिषदेने (जि.पालघर), आरक्षित भूखंडावर बांधलेल्या घरांचे आदिवासी बांधवांना वाटप होणेबाबत

**(४५) ३५६५१ (२५-११-२०२१). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार (जि.पालघर) नगरपरिषदेने खंडेराव मंदिराच्या जवळील आरक्षित भूखंडावर आदिवासी विभागाने ३७ लाख रुपये खर्च करुन बांधलेली ११ घरे १० वर्षे होऊनही आदिवासींना वाटप करण्यात आली नसल्याची बाब दि.१७ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ११ घरांचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे असून १० वर्षात घरांचे वाटप न झाल्याने सदरहू घरांची बांधकामे जीर्ण होऊन घरे पडण्याच्या अवस्थेत आहेत हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-१२-२०२१) :** (१) आदिवासी उपयोजने अंतर्गत जव्हार नगरपरिषदेने बांधलेल्या गाळयांचे अदयापपर्यंत वाटप झालेले नाही, ही वस्तुस्थिती आहे.

(२) हे खरे नाही.

(३) जव्हार नगरपरिषदेने राबविलेल्या निविदा प्रक्रियेस विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे नापरतावा अधिमुल्य कमी करण्याबाबत नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेने पारित केलेला ठराव जिल्हाधिकारी, पालघर यांचेकडे मान्यतेसाठी सादर करण्यात आल्याचे नगरपरिषदेने कळविले आहे.

• सदर गाळयांची निविदा प्रक्रिया पूर्ण करुन त्याचे वाटप संबंधितांना तातडीने करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी, पालघर यांना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खामगाव, (जि. बुलढाणा) तालुक्यातील वर्णा फाटा ते हीवरखेड प्रजीमा १५ कि.मी. ०० ते १३.०० या रस्त्यावरील ११ लहान मोठे पुलाचे बांधकामाबाबत**

**(४६) ३५६७८ (२३-११-२०२१). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगाव, (जि. बुलढाणा) तालुक्यातील वर्णा फाटा ते हिवरखेड प्रजीमा १५ या रस्त्याचे डांबरीकरण करण्यात आले असून सदर रस्त्यावरील लहान-मोठे पूल अद्याप पूर्ण न झाल्यामुळे नागरिकांना शेती माल तसेच इतर वाहतुकीसाठी अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदर लहान-मोठे ११ पुलाचे बांधकाम करण्यासाठी शासनाने मंजुरी दिली आहे काय, तसेच सदरचे पूल बांधून किती कालावधीत पूर्ण होणार आहेत व त्याकरिता किती निधीची आवश्यकता आहे,

(३) असल्यास, सदरचा निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (०७-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) प्रश्नांकित ११ लहान मोठ्या पुलांच्या कामाकरीता अंदाजे रु.८५०.०० लाख इतक्या निधीची आवश्यकता असुन सदरची कामे ही निकष, मंजूरी व निधी उपलब्धततेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन राहील.

---

**खामगाव - बोथा - बुलढाणा रस्ता निकृष्ट दर्जाचा झाल्यामुळे अपघातांच्या संख्येत वाढ होत असल्याबाबत**

**(४७) ३५६८३ (२३-११-२०२१). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगाव-बोथा-बुलढाणा या रस्त्याचे नुकतेच बांधकाम करण्यात आले असून सदरहू रस्त्याचे काम हे घाईघाईने जुन्या रस्त्यावर डांबर टाकून व निकृष्ट दर्जाचे करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रस्त्याची प्रत्यक्ष पाहणी व तपासणी न करताच या रस्त्याच्या कामांची देयके संबंधित कंत्राटदारांना अदा करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू रस्त्याच्या आजूबाजूला मोठं मोठे खड्डे खोदून ठेऊन व अद्यापहि दिशादर्शक फलक (साईन बोर्ड) न लावल्यामुळे व रस्त्याचे काम पूर्णपणे बंद असल्यामुळे रस्त्यावरील अपघातांच्या संख्येत वाढ झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू रस्त्याची गुण नियंत्रण विभागाकडून तपासणी करून या प्रकरणातील दोषींवर तसेच संबंधित कंत्राटदार यांचेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, त्याचा तपशील काय आहे, नसल्यास या प्रकरणी कारवाईस होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत व संबंधितांवर किती कालावधीत कोणती कारवाई करण्यात येणार असून त्याबाबत शासनाची नेमकी भूमिका काय?

**श्री. अशोकराव चव्हाण (१४-१२-२०२१) : (**१) हे खरे नाही.

सदर काम मंजूर वावानुसार (scope) व मानकानुसार (norms) करण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

सदर कामाची पाहणी व तपासणी करुन रस्त्याचे काम मंजूर वावानुसार (scope) व मानकानुसार (norms) करुन घेण्यात आले आहे व झालेल्या कामाची कंत्राटदारास देयके अदा करण्यात आली आहेत.

(३) हे खरे नाही.

सदर रस्त्याचे रुंदीकरण व डांबरी नुतनीकरणाचे काम प्रगतीत असतांना वन क्षेत्रातील व ज्ञानगंगा अभयारण्याच्या पर्यावरणीय संवेदनशील भागातील काम वनविभागाकडून थांबविण्यात आले होते. तथापि सदयस्थितीत ज्ञानगंगा अभयारण्याच्या पर्यावरणीय संवेदनशील भागातील कामाकरीता परवानगी प्राप्त झाली असल्याने काम प्रगतीपथावर आहे. तसेच काम करताना दिशादर्शक फलक, सूचना फलक लावण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शिरपूर (जि.धुळे) हद्दीत वनजमिनीवर व खाजगी क्षेत्रातील शेत जमिनी वर अवैधरित्या गांजाची शेती होत असल्याबाबत

**(४८) ३५७१८ (२५-११-२०२१). श्री.फारूक शाह (धुळे शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्ह्यातील शिरपूर हद्दीतील हजारो एकर वनजमिनीवर तसेच खाजगी शेत जमिनीवर अवैधरित्या गांजाची शेती होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विभागातील संबंधित वन अधिकारी आणि पोलिस अधिकारी यांच्या संगनमताने सदर गांजा शेतीला अभय मिळत असून या अधिकाऱ्यांनी अवैध संपत्ती जमविली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिरपूर हद्दीतील अवैध गांजा शेतीला जबाबदार वन विभागाच्या व गृह विभागाच्या पोलिस अधिकाऱ्यांविरुद्ध शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उद्धव ठाकरे (०६-१२-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.

धुळे वन विभागाअंतर्गत शिरपूर तालुक्यातील वनक्षेत्रावर गांजाची शेती होत असल्याची बाब निदर्शनास आली नाही. तथापि, अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वन हक्काची मान्यता) अधिनियम, २००६ आणि नियम, २००८ अन्वये मंजूर वनपट्ट्यांवर तसेच इतर वनपट्ट्यांवर गांजाची शेती होत असल्याचे अत्यल्प प्रमाणात आढळून आले आहे. असे निदर्शनास आल्यानंतर पोलीस व वन विभाग यांनी संयुक्त कारवाई करुन पोलीस विभागाने गुन्हे दाखल केले आहेत व मुद्देमाल जप्त केला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कडेगाव (जि.सांगली) तालुक्यात वन्य प्राण्यांची शिकार व दुर्घटना वाढत असल्याबाबत**

**(४९) ३५९१९ (२३-११-२०२१). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कडेगाव (जि.सांगली) तालुक्यात वन्य प्राण्यांची शिकार व दुर्घटना घडण्याच्या घटनांमध्ये प्रचंड वाढ झाल्याचे माहे ऑक्टोंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वन्य प्राण्यांची शिकार व घटत असलेल्या दुर्घटनांकडे कडेगांव -पलूस वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालयाचे दुर्लक्ष होत आहे हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, वन्य प्राण्यांच्या वाढत्या शिकारीमुळे वन्यप्रेमी व नागरिकांमध्ये प्रचंड नाराजी पसरलेली आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने पाहणी /चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(५) तदनुसार, जबाबदार असणा-या विरुध्द कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उद्धव ठाकरे (१४-१२-२०२१) :** (१) माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये सांगली वन विभागातील कडेगाव वनपरिक्षेत्रात घोरपड या वन्यप्राण्याची शिकार झाल्याची घटना निदर्शनास आली आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

(४) प्रस्तुत प्रकरणी प्रचलित नियमातील तरतूदीनुसार वनगुन्हा नोंदवून एका आरोपीस अटक करण्यात आली असून पुढील तपास सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्याच्या विविध भागांत मोठया प्रमाणात बेकायदा वृक्षतोड सुरु असल्याबाबत**

**(५०) ३६१५३ (२३-११-२०२१). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्याच्या विविध भागांत मोठया प्रमाणात बेकायदा वृक्षतोड सुरु असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२१ मध्ये निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू वृक्षतोड करतांना वन विभागाची परवानगी न घेता सरसकट विविध प्रकारची झाडे जमीनदोस्त केली जात आहेत हे खरे आहे काय,
(३) असल्यास, बेकायदेशीर होत असलेल्या वृक्षतोडीवर वन विभागाने तातडीने कारवाई करण्याची मागणी पर्यावरणप्रेमीनी निवेदनाद्वारे वन विभागाकडे केली आहे हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू निवेदनाच्या अनुषंगाने वन विभागाने दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उद्धव ठाकरे (०६-१२-२०२१) : (**१) व (२) माहे नोव्हेंबर, २०२१ मध्ये संगमेश्वर तालुक्याच्या (जि.रत्नागिरी) मौजे फणसवणे गावामध्ये मालकी गट नं.४८७ मधील मालकी क्षेत्रात साग झाडे ३६ विनापरवाना तोडून त्यापासून उत्पादित नग १५८/९.११८ घ.मी. झाल्याचे निदर्शनास आलेले आहे.
(३) असे कोणतेही निवेदन वनविभागाकडे प्राप्त झालेले नाही. परंतू दै.रत्नागिरी टाइम्स मध्ये दिनांक ८.११.२०२१ रोजी वृत्तपत्रामध्ये सदरची बातमी प्रकाशित करणेत आलेली होती.
(४) सदरच्या बातमीच्या अनुषंगाने वनपरिक्षेत्र अधिकारी, रत्नागिरी यांचेमार्फत चौकशी केली असता, सदरची तोड रफिक जमाल वलेले व इतर ५ यांनी फणसवणे ता.संगमेश्वर मालकी गट नं.४८७ मध्ये एकूण ३६ साग झाडे विनापरवाना तोड झाल्याचे व त्यापासून उत्पादित नग तयार केला आहे. त्याबाबत वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी प्र.गु.रि.क्र.०४/२०२१ दिनांक ८.११.२०२१ नोंदविला आहे. त्याचप्रमाणे भारतीय वन अधिनियम, १९२७ चे कलम ४१ (२) (ब) अंतर्गत गुन्हा नोंद करणेत आलेला असून साग वृक्षतोडीबाबतची कारवाई पूर्ण करुन आरोपी यांचेकडून दिनांक २६.११.२०२१ रोजी रु.७२००/- इतका दंड वसूल केलेला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **राजेन्द्र भागवत**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.